कोरोना डायरीज...

कोरोना वॉर्डमध्ये ॲडमिट असताना लिहिलेल्या लेखांचे संकलन

लेखक:

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

कोरोना डायरीज

लेखक: जयेश शत्रुघ्न मेस्त्री

सुघोष प्रकाशन

कोरोना डायरीज

लेखक: जयेश शत्रुघ्न मेस्त्री
ईमेल: writerjayeshmestry@gmail.com
युट्यूब चॅनल: Mestry Mystery

या पुस्तकातील लेखकाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई प्रकाशक: सुघोष प्रकाशन
writerjayeshmestry@gmail.com
ई प्रकाशन: ऑगस्ट २०२०
मुखपृष्ठ: श्री. विजय खडंग

देणगी मूल्य: २० रुपये

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

जयेश मेस्त्री हे व्यवसायाने लेखक आणि वक्ते असून कथा, कविता, नाट्य, समिक्षा, अनुवाद अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांचा वावर असतो. गेली १५ वर्षे ते प्रायोगिक रंगभूमीवर अभिनेता, लेखक व दिग्दर्शक म्हणून काम करत आहेत. संस्कार भारती, पु. भा. भावे स्मृती समिती सारख्या संस्थांमधून सामाजिक क्षेत्रातही ते कार्य करीत असतात. दैनिक, सामना, नवशक्ती, विवेक, विवेक विचार, अधिष्ठान, धर्मभास्कर अशा अनेक नियतकालिकांतून त्यांनी स्तंभ लेखन केले आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (सेन्सॉर बोर्ड) येथे ते सल्लागार सदस्य म्हणून कार्यरत आहेत. नेकेड ऍंड अफ्रेड, मॅन व्हर्सेस वाईल्ड या डिस्कवरीवरील तसेच देवो के देव महादेव, महाभारत, लॉज ऍंड ऑर्डर्स अशा अनेक मालिकांचे त्यांनी मराठीत भाषांतर केले आहे.

कोरोना वॉर्डमध्ये ऍडमिट असताना तसेच वडीलांच्या मृत्यूची बातमी आली असताना देखील त्यांनी #कोरोना_डायरीज म्हणून लेख मालिका सुरु केली आणि पाहता पाहता सबंध महाराष्ट्रात ही लेख मालिका गाजली. त्या लेखमालिकांचे संकलन करुन या पुस्तकाची निर्मिती झाली आहे.

अर्पण पत्रिका

विश्वाच्या कल्याणासाठी विश्वाच्या ईश्वराकडे
पसायदान मागणार्याक ज्ञानेश्वर माऊलींना हे पुस्तक अर्पण...

लेखकाचे शब्द...

नमस्कार मित्रांनो, कोरोना वॉर्डमध्ये ॲडमिट असताना लिहिलेल्या कोरोना डायरीजचे पुस्तक आज तुमच्यासमोर ठेवताना खूप आनंद होतोय... पुढे पुस्तकामध्ये मी तुमच्याशी सविस्तर संवाद साधणार आहे म्हणून इथे शब्द खर्च करण्याचे टाळतोय. मी तुम्हा सर्वांना इतकंच सांगेन की हे पुस्तक अनेकानेक लोकांपर्यंत पोहोचवा. या पुस्तकाच्या रुपाने सकारात्मकता पोहोचावी इतकीच माझी अपेक्षा आहे. देणगी मूल्यही कमी ठेवले आहे कारण प्रत्येक माणसाला हे पुस्तक परवडले पाहिजे. त्याचबरोबर तुम्ही केवळ २०/- रुपये खर्च करुन लेखकाची खूप मोठी मदत करत असता... लेखक आपल्या लेखणीवरच जगत असतो...

मी वाचकांना आवाहन करेन की जर तुम्हाला शक्य असेल तर हे ई पुस्तक लोकांना भेट द्या... प्रकाशकांना आवाहन करतो की जर याचे छापील पुस्तक करायचे असल्यास माझ्याशी अवश्य संपर्क साधा...

खुश रहा... आनंदी रहा... तुम्ही जगा आणि दुसर्या.ला जगवा... पुस्तक वाचून आपला अभिप्राय अवश्य कळवा...

@जयेश शत्रुघ्न मेस्त्री

सावरकरांचे खरे वारसदार

नमस्कार मित्रांनो, खरंतर कुठल्याही पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिण्याची ही माझी पहीलीच वेळ.. एके दिवशी जयेश मेस्त्री यांचा मला मेसेज आला की आपण माझ्या येऊ घातलेल्या "कोरोना डायरीज" या ई पुस्तकासाठी प्रस्तावना लिहावी अशी माझी खूप इच्छा आहे. तेव्हा खरंतर माझ्यासाठी ते एकदम शॉकींग होतं. इतकी मोठी जबाबदारी आणि मी त्यास सक्षम आहे की नाही ही शंका मनात आली तशी मी त्यांना बोलूनही दाखवली, पण त्यांनी तुम्हीच या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिण्यास योग्य व्यक्ती आहात, मला पुर्ण विश्वास आहे तुमच्यावर असं ज्यावेळेस त्यांनी मला सांगितलं त्यावेळेस मात्र मग... ठिकाय, लिहीन मी म्हणून त्यांना सांगितलं, पण पुढचा पूर्ण आठवडा वेळच मिळाला नाही, आता मुहूर्त मिळाला आणि लिहायला बसलो...

खरंतर हे पुस्तक फक्त पुस्तक नसून त्यांच्या अनुभवाची शिदोरी आहे. जेव्हा काही वर्षांनी जगाची BC (बिफोर करोना) आणि AC (आफ्टर करोना) अशी विभागणी होईल तेव्हा हे पुस्तक त्या दोन्ही काळातील एक दुवाच ठरणार आहे. वडील कोविड पॉझिटिव्ह आले आणि सिरीयस अवस्थेत उपचार घेत असतानाच जयेश मेस्त्रींचा, त्यांच्या आईचा आणि पत्नीचा रिपोर्ट देखील पॉझिटिव्ह आला. मुंबईच्या क्वारंटाईन सेंटरमध्ये ॲडमिट असताना त्यांनी एक लेख लिहिला आणि त्यांच्या फेसबुक पेजवर प्रकाशित केला. तो मोठ्या प्रमाणात वायरल झाला. त्यात त्यांनी

उध्दव सरकारच्या कारभारावर ताशेरे ओढले. बऱ्याच जणांना ती पोस्ट खूपच झोंबली, भयंकर आणि अतिशय घाणेरड्या पद्धतीने जयेशला ट्रोल करण्यात आले, वडील करोनाने अजारी असतांना मुलगा उध्दव सरकार विरोधात दीर्घ लेख लिहीत होता इथपासून ते सरकार विरोधात लिहिता यावं म्हणूण बापाला मुद्दामच कोरोना लावून घेतला इथपर्यंत ती मजल गेली. हे सगळं जयेश क्वारंटीन रुम मधून बघत होता, सगळ्या प्रतिक्रिया वाचत होता, खरंतर अश्या परिस्थितीत हे एखाद्यासाठी खूपच डिस्टर्ब करणारं होतं, मानसिक संतुलन ढासळवणारं होतं, पण स्वतः आणि सगळं कुटुंब कोरोना पॉजिटिव्ह झाल्यानंतर मुंबईच्या रामलीला मैदानातील कोरोना वॉर्डमध्ये ऍडमिट झाल्यानंतर... त्याही परिस्थितीत जयेश न डगमगता खंबीरपणे लिहीत राहीला, टिकाकारांची पर्वा न करता एक लेखकाचं कर्तव्य पार पाडत राहीला... आणि त्यातूनच कोरोना डायरीज जन्माला आली.

हे सगळं लिहीत असतानाच वाचकांमधून देखील प्रतिक्रिया येत होत्या की जयेशनी या सगळ्या अनुभवांचं एक पुस्तक करावं जेणेकरून बऱ्याच लोकांपर्यंत ते पोहचेल आणि त्यांना याचा फायदा होईल, या काळात खरंतर वाचकांची खूप मोठी शक्ती जयेशच्या पाठीशी उभी होती. त्यामुळेच कदाचित त्याला त्या काळात खंबीर राहण्यास मदत मिळाली असावी, वाचकांची शक्ती मागे असली की अंगात दहा हत्तींचं बळ संचारतं हे एक लेखक म्हणून मला चांगलंच माहीत आहे. मग काय? कोविड वॉर्डमध्ये जाताना सोबत सावरकरांचं "माझी जन्मठेप" हे पुस्तक घेऊन गेलेला जयेश कसला डगमगतोय? सावरकरांचे विचार

आणि वाचकांचा पाठींबा यामुळे तो लिहित गेला आणि आज अखेर त्या लेखणीने एका पुस्तकाचं रुप घेतलंय...
पुढे दुसऱ्या तिसऱ्या लेखांनंतरच वडीलांच्या निधनाची बातमी आली आणि संपूर्ण मित्र परिवारावर एकच शोककळा पसरली. आता जयेश कोसळेल आणि या पुढे तो काही लिहित नाही असंच सगळ्यांना वाटत होतं, पण त्या पुढच्याच लेखात "जीवाच्या भेटीला शिव गेला म्हणजे जन्म आणि शिवाच्या भेटीला जीव गेला म्हणजे मरण" अशी व्याख्या करत वडील आज शिवभेटीला निघून गेले असं वर्णन वाचलं आणि वाटलं हा माणूस म्हणजे काही वेगळंच रसायन आहे, सावरकर या माणसाच्या नसांनसांत अक्षरशः भिनलेत.

त्यानंतर मग त्याचे लेख आणखीनच प्रगल्भ होत गेले, विराट कोहली ते रतन टाटा अश्या व्यक्तींचे उदाहरण देत असतांना टाटा सूमो हे नाव कसं एका मराठी व्यक्तीमुळे पडलं याची कहाणी मांडत असतांना समस्त मराठी माणसाला बळ देण्याचं कार्यच जणू त्याने केलं.... एक डॉक्टर म्हणून मला ठाऊक आहे की एका कोविड रुग्णाची उपचारा दरम्यान काय आवस्था असते... तो पुर्णपणे कोलमडलेला असतो, आतून घाबरेला असतो, आपण यातून जगू की नाही हा एकच प्रश्न सतत छळत असतो, हातपाय गळून गेलेले असतात (एकतर आजाराने आणि दुसरं विचाराने) त्यावेळेस एक सर्वसामान्य मनुष्य फक्त स्वतःबद्दल विचार करु शकतो. पण अश्या परिस्थितीत सुद्धा एक पुस्तक लिहिणे जेणेकरून आपल्या अनुभवाचा फायदा इतरांनाही व्हावा

हा विचार म्हणजे तुम्ही माणूस म्हणून किती मोठे आहात, किती ग्रेट आहात हेच दर्शवते.

पुढे यात जयेश म्हणतो "रगत निघल तरी बी हसल, शाबास तेची, तु चाल पुढं तुला रं गड्या भिती कशाची अन पर्वा बी कुनाची" तुम्हाला खरं सांगतो जो कुणी हे पुस्तक वाचेल, मरणाची भिती त्याला शिवणार देखील नाही. कोविडबद्दल लोकांच्या मनात असलेली संभ्रामावस्था, एक अनाहूत भिती दूर करण्याचं काम हे पुस्तक नक्कीच करणार आहे याची मी आपणांस खात्री देतो.... शेवटी फक्त इतकंच म्हणेण की सागराच्या किनारी बसून सावरकरांची
"ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला..." लिहितांना सावरकरांची जी मनाची अवस्था असेल अगदी तशीच आणि तीच अवस्था जयेशची हे पुस्तक लिहित असताना झाली असेल, कोविड वॉर्डमधून बाहेर पडायचंय ते स्वतःचं आयुष्य मजेत जगण्यासाठी नव्हे तर आपला अनुभव लोकांना वाटण्यासाठी, ही तळमळ त्याच्या प्रत्येक ओळीतून तुम्हाला हे पुस्तक वाचताना जाणवेल आणि म्हणूणच मी त्यांना मागे एकदा बोललो होतो, "जयेशजी, तुम्हीच सावरकरांचे खरे वारसदार" कारण त्या शिवाय इतका खंबीरपणा येऊच शकत नाही...

सावरकरांव्यतरिक्त जयेश यांनी या पुस्तकात आणखीन एक उल्लेख वारंवार केलाय तो म्हणजे "छत्रपती शिवाजी महाराज" यांचा... या दोन शक्ती जणू या कठीण समयी त्यांच्या पाठीशीच उभ्या होत्या आणि

म्हणूनच कदाचित ते यातूनं सुखरुप बाहेर पडू शकले. शेवटी त्यांच्या या पुस्तकाला आणि त्यांच्या भावी आयुष्याला खूप खूप शुभेच्छा देत मी माझी प्रस्तावना संपवतो...

धन्यवाद

@डॉ. इमरान शेख

आपल्यातील 'मी' शोधण्याचा मार्ग

संपूर्ण विश्व आपल्या दैनंदिन कामाकाजात व्यस्त असताना, अचानक कोरोना नामक राक्षसाने केवळ भारतात नाही, तर संपूर्ण जगात प्रवेश केला. हळू हळू एक एक देशाला शिकार बनवत त्याने भारत देखील गाठले. कोरोनामुळे श्रीमंतांच्या आयुष्यात काही फारसा फरक पडला नाही. पण, सामान्य-मध्यमवर्गीय गरीब झाले. जे गरीब होते, ते अति गरीब झाले. आणि भ्रष्टाचारी अजून भ्रष्टाचारी झाले. एक ना अनेक असे लाखो लोक या आजारातून जाताना अनेकांनी आपले आप्त-स्वकीय गमावले. या काळात रोगप्रतिकारशक्तीची नितांत आवश्यकता असताना, कोरोनाच्या भीतीने नकारात्मक शक्ती देखील आपल्या आजूबाजूला वास करत होतीच. या आजाराने लेखक जयेश दादा मेस्त्री यांच्या घरात जेव्हा पाऊल टाकले; त्यावेळी माझ्यासकट अनेकांच्या मनातील कोरोना आणि मृत्यूची भीती तर दूर झालीच, पण त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. असे नेमके काय झाले असेल? तर त्याचे उत्तर तुम्हा सर्वांना जयेश मेस्त्री लिखित 'कोरोना डायरीज'मध्ये सापडणार आहे.

जयेश दादा म्हणजे 'दिसामाजी काहीतरी लिहावे' या समर्थांच्या संदेशाला अनुसरन करणारे लेखक. केवळ ते लेखक नाहीत, तर नाट्ककार, कवी, समीक्षक, पत्रकार असे अनेकविध पैलू असणारी असामान्य व्यक्ती आहे. कोरोनाने त्यांच्या वडिलांचे पितृछत्र हिरावून

घेतले खरे, पण त्यामुळे त्यांच्या सकट त्यांच्या वाचकांनी माणुसकीचा एक विदारक अनुभव देखील घेतला. वडील हॉस्पिटलमध्ये एडमिट असताना, शासन, प्रशासन यांच्या चालणाऱ्या भोंगळ कारभाराविषयक जेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणून त्यांनी आवाज उठवला; त्यावेळी मात्र काही समाजाकंटकांनी अतिशय हीन दर्जाची टीका त्यांच्यावर केली. त्याच दरम्यान त्यांचे वडील गेले. त्यावेळी मात्र, त्यांना खऱ्या माणुसकीचे दर्शन झाले. त्यांनी लिखाण क्षेत्रात केलेल्या प्रामाणिक प्रबोधनाचे ते फळच म्हणावे. एकीकडे त्यांच्या वाचकांनी त्यांना धीर तर दिलाच, परंतु दुसरीकडे वाचकांना एका वेगळ्या जयेश मेस्त्रींचे दर्शन झाले. लेखक लिहीत असतो, समाजात चांगल्या-वाईट गोष्टींवर तो सातत्याने आवाज उठवत असतो. पण, त्याचे खरे कर्तव्य म्हणजे वाईट विचारांच्या अधीन गेलेल्या समाजाला चांगल्या वृत्तीची शिकवण देणे. आ. संभाजीराव भिडे गुरुजी म्हणतात; कि पत्रकाराने आणि लेखकाने समाजरक्षक आणि समाजशिक्षक असावे. संपूर्ण गळून पडलेल्या घराला धीर देताना जयेश मेस्त्री समाजसाठी शिक्षक देखील बनले. त्याचे प्रकट दर्शन कोरोनाची डायरी आहे.

कोरोना झालेल्या व्यक्तीला रोगप्रतिकारशक्ती वाढवणे हाच मोठा उपाय आहे. पण एकीकडे छत्र हरपलेल्या वडिलांची जबाबदारी, आयुष्यातील साथीदार गमावणाऱ्या आईला सावरणे आणि दुसरीकडे गळून न पडता, कोरोनाशी यशस्वी झुंज देणे हि गोष्ट सोपी नव्हती. पण ते सहज शक्य झाले, त्याचे कारण अंगात होते ते बळ जगतजननी भारतमाता, छत्रपती शिवाजी महाराज, ज्ञानेश्वर माऊली आणि स्वातंत्र्यवीर

सावरकर यांचे! महापुरुष केवळ गौरवण्याकरता नसतात, तर ते अनुकरणीय असतात. ज्या ज्या वेळी आपल्या आयुष्यात अंधकार येतो, त्या वेळी डिप्रेशन म्हणून औषधोपचार करण्यापेक्षा महापुरुषांची चरित्रे, ही आपल्याला नवा जन्म देतात. जगतजननी भारतमाता, छत्रपती शिवाजी महाराज, ज्ञानेश्वर माऊली, स्वातंत्र्यवीर सावरकर हे चार जण त्यागाचे प्रतीक. जगतजननी भारतमातेवर असंख्य आक्रमकांनी आक्रमण केले. तिच्यावर अनेक घाव घातले. रक्ताळलेल्या अवस्थेत देखील त्यागातून तिने जगण्याचा मार्ग दाखवला. जगी दाटतो पूर्णतः अंधकार । दिसे मार्ग न लक्ष्मी सर्वस्वी दूर । अशा संकटी कोणी न घाबरावे। शिवाजी चरित्रास भावे स्मरावे ।।(लेखक - आ. संभाजीराव भिडे गुरुजी) जेव्हा आयुष्यात अंधकार येतो त्यावेळी शिवाजी महाराजांचे चरित्र स्मरून संकटाला सामोरे जावे; हेच जयेश मेस्त्री यांनी केले. अवघ्या लहान वयात समाजाने फेकलेले दगड-शेण अंगावर घेऊन देखील ज्ञानेश्वर माऊलींनी अवघाची संसार सुखाचा करीन हेच मागणे देवाकडे मागितले. त्यांनी समाजासाठी सुख मागितले तर स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी परकीय म्हणजे ब्रिटिशांच्या आणि स्वकीय म्हणजे समाजाच्या देखील अतोनात यातना सहन करून स्वातंत्र्यप्राप्तीचा लढा दिला. या चौघांना स्मरून, अंगीकारून इतकेच नव्हे, तर संपूर्ण समाजाला आपल्या लेखणीतून या चारही महापुरुषांच्या त्यागाची, लढण्याची आठवण करून देत कोरोनावावर त्यांनी यशस्वी मात केली. त्यातून माझ्यासारख्या अनेकांच्या खचलेल्या मनाला देखील धीर मिळाला.

आपल्या प्रामाणिक कार्याची पोचपावती आपल्याला आपल्या संकटात जरूर मिळते. जयेश दादांच्या आयुष्यात हा काळ त्यांनी केलेल्या कामाची परीक्षा होतीच; पण त्यांना मिळालेली त्यांच्या वाचक चाहता वर्गाची साथ ही त्या चांगल्या कार्याची पोचपावती होती. माझा आणि दादांचा परिचय म्हणजे अप्रत्यक्षपणे शिकवण देणारे आणि घेणारे गुरु-शिष्यच. मी पत्रकारिताच्या प्रथम वर्षात शिकत होते. त्यावेळी मी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला आणि दादा परीक्षक होते. त्यांनी दिलेले मार्गदर्शन पाहून मी प्रेरित झाले. आणि मनोमन या क्षेत्रातील पहिला गुरू मानले. त्यांनी कोरोना सारख्या महासंकटात स्वतः ला कोरोना झाल्यावर जेव्हा खचून न जाता विश्वाला 'आता विश्वात्मकें देवें' हा ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश जागवला, त्यावेळी मात्र आपल्याला योग्य दिशादर्शक गुरू भेटल्याची जाणीव मनाला झाली. 'हिमालयातील महातम्यांच्या सहवासात' या पुस्तकात स्वामी राम असे लिहितात, कि शिष्याला गुरु सुद्धा गुरु असण्याच्या पात्रतेचा असला पाहिजे. जयेश दादांच्या या गुरुत्वाची सिद्धता मला या काळात मिळाली.

तुम्हाला 'कोरोना डायरीज' मध्ये थकलेल्या, थांबलेल्या आणि जीवनाला कंटाळलेल्या मनाला नवसंजीवनी मिळणार आहे. संपूर्ण जग नकारात्माच्या अंधकारात असताना सकारात्मक जीवन जगण्याचे गूढ यामध्ये सापडणार आहे. या कोरोना काळात जयेश दादांनी स्वतः मधील 'मी'चा शोध घेतला. आणि त्यांना जे अनुभव आले, ते लेखणीतून त्यांनी साकारले. हि कोरोना डायरी वाचून आपल्याला देखील आपल्यातील मी गवसणार आहे. चला तर मग, आपल्या 'मी'चा शोध

घेऊया.

@नेहा जाधव.
पत्रकार आणि लेखिका

कोरावणाचा वध आणि कोरोना योद्ध्याची लेखणी

लेखकासाठी लेखणी म्हणजे त्याचा श्वासच असते. दिवसातून काहीतरी लिहील्याशिवाय त्याला झोप सुद्धा येत नसावी. कितीही मोठ संकट आलं तरी लेखन करायचाच असा दृढ निश्चय घेवून लिखाण करणारा लेखक म्हणजे जयेश मेस्त्री साक्षात देवी सरस्वतीच त्यांची लेखणी बनून अवतरत असावी असाच भास होतो. कोरोना झाला असतानाही लेखणीतून शब्दरुपी सॅनिटायझरने समाजातील कोरोनाची भितीच सॅनिटाईज केली. एक लेखक आपल्या लेखणीतून काय करु शकतो याच मुर्तीमंत उदाहरण म्हणजे जयेशजी मेस्त्री.

संपुर्ण परीवार क्वारंटाईन असताना परीवार आणि लेखन प्रपंच नेटाने सांभाळणारे जयेशजी समाजाने कोरोनाची भिती बाळगू नये हाच संदेश देत आहेत. त्यांच्यावर आलेले संकट खूप भयंकर होते आणि त्यातून ते त्याला सामोरं जाऊन एक आदर्श समाजापुढे ठेवलाय.

प्रसारमाध्यमे वर्तमानपत्रे यांनीच कोरोनाची जास्त भिती लोकांच्या मनात घातलीय. कोरोना आपल्यापेक्षाही कमकूवत आहे हा संदेशच जयेश जी यांनी दिलाय. संकटकाळात संकटावर मात करण्यासाठी दैवी शक्तीची आवश्यकता असते. संकटाला न घाबरता त्याला सामोरे जायचं असतं. जयेशजींना कोरोना झालेला अन त्यात त्यांचे वडील कोरोनामुळे

देवाच्या भेटीस गेले. अशा संकटात कुणाची तरी साथ हवीच असते. ती साथ मिळाली लेखणीतून. कोरोना झाला असतानाही लेखनातून ढिसाळ प्रशासना विरोधात त्यांनी लिहीले. त्यांना सोशल मिडीयाच्या माध्यमातून वाचकांचीही साथ मिळाली. ही तर त्यांना वाचकांकडून मिळालेली पोच पावतीच होती. माणसाने केलेल्या चांगल्या कामाची पावती त्याला संकटात नक्कीच मिळत असते.

जयेशजी यांच मार्गदर्शन नेहमी मिळत असतं आणि ते आजपर्यंत मिळत आलंय. लेखन कसं करावं, लेखकाचा कर्तव्य काय, हे जयेशजींकडून शिकण्यासारखं आहे. वडील म्हणजे आधारवड नेहमी मुलाला प्रत्येक बाबतीत मार्गदर्शन करत असतात. घरात वडीलधारी व्यक्ती असणं म्हणजे घराला घरपण मिळत असतं. वडीलांमुळे निर्धास्त जीवन आपण जगत असतो कारण बर्यातच गोष्टींची जाणिव आपल्याला झालेली नसते पण जेव्हा वडीलच गेले की सर्व जबाबदार्या अंगावर येतात. अन अशा जबाबदारी आता जयेशजींवर आलीय. विचार करा महाभयंकर आजार झालेला आणि त्यात पितृछत्र हरपलं, काय अवस्था झाली असणार? विचार करुनच डोक सुन्न होतं. जयेशजींवर संकट कोसळलं त्यांनी काय अनुभवलं असेलं?

कोरोना पॉझिटीव आला पण ते काय निगेटिव्ह झाले नाही, कारण आपली हिंदू संस्कृती आपल्याला सकारात्मक राहायला शिकवते. कोरोना झालेल्यांनी कोरोना डायरीज वाचली तर मला वाटतं त्यांच्यात

सकारात्मक जागृत राहील. तुम्ही सकारात्मक असाल तर तुम्हाला काहीच अशक्य नाही. कोरावणाचा वध आपल्या सर्वांना मिळून करायचा आहे. कोरोनाला घाबरुन न जाता त्याला धैर्याने आणि प्रतिकारशक्ती वाढवून त्याला सामोरं जायला हवं. आपल्यापुढे कोरोना खुपच कमकुवत आहे, याचं उत्तर आपल्याला कोरोना डायरीजमधून नक्कीच मिळेल.

@विरेंद्र सोनावणे
पत्रकार, शिक्षक आणि लेखक

आता विश्वात्मके देवे...

6 दिवसांपूर्वी बाबा पोजिटिव्ह आले. आज मी, आई आणि पत्नी पोजिटिव्ह आलो. आमच्या 7 वर्षांच्या मुलाचा रिपोर्ट निगेटिव्ह आला म्हणून लगेच डॉक्टरांच्या मार्गदर्शनाने त्याला बायकोच्या माहेरी पाठवलं. आम्हाला मालाड पूर्वेच्या रामलीला मैदानाच्या बिल्डिंगमध्ये पाठवलं.

इथे कोरोना सेंटरमध्ये आल्यावर सुरुवातीला मन अस्वस्थ झालं. किमान 10 दिवस इथे राहायचं म्हणजे त्रासदायकच आहे. अशा वातावरणात चांगला माणूस आला तरी आजारी पडेल. पण नियम म्हटल्यावर तो पाळलाच पाहिजे. आयुष्यात पहिल्यांदा चाळीत राहण्याचं दुःख होतंय कारण बिल्डिंगमध्ये राहत असतो तर कदाचित घरात राहून उपचार करता आले असते. असो...

मी माझ्यासोबत सावरकरांचं "माझी जन्मठेप" हे पुस्तक घेतलेलं आहे. सावरकर नावाच्या बारीक आणि बुटक्या मूर्तीचा नुसता फोटो जरी पहिला तरी हजार हत्तीचं बळ अंगात येतं. आता तर सोबतीला माझी जन्मठेप आहे. हे पुस्तक मी यापूर्वी वाचलेलं आहे. म्हणजे मला आता फक्त रिव्हिजन करायचं आहे. सावरकरांना 50 वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा झाली होती तेव्हा ते माझ्या आताच्या वयानुसार 10 - 12 वर्षे लहान होते. विशीतला तो नवतरुण. त्या मानाने मी बराच प्रौढ आहे. जेव्हा पहिल्यांदा अस्वस्थ वाटलं तेव्हा सर्वप्रथम माझ्या डोळ्यांपुढे

सावरकर आणि ज्ञानेश्वर माऊली उभी राहिली. माऊली आणि सावरकरांमध्ये मला नेहमीच साम्य वाटले आहे. दोघांनी समाजाकडून हालअपेष्टा सहन केल्या आणि दोघांनी विश्वाच्या ईश्वराकडे विश्वाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले. काय मनःस्थिती असेल या दोघांची... नेमके कोणत्या मातीचे ते बनले होते कुणास ठाऊक. आणि आपल्यावर लोकांनी जरा टीका केली की आपण वैतागतो....

आता इथे कोविड सेंटरमधल्या लोकांकडे मी बघतो आणि मला प्रश्न पडतो की आम्ही सगळे एकत्र का आलो? त्यांचं आणि माझं नात काय? कोरोना नसता तर आम्ही एकत्र आलोच नसतो. ज्ञानदेवांसारख्या तपस्वी लोकांच्या दृष्टिकोनातून बोलायचं झालं तर त्यांच्यातही तो आहे जो माझ्यात आहे. आम्ही सगळे त्या एका शिव तत्वाने बांधलेले आहोत. हे जग त्या एका शिव तत्वाने बांधलेले आहे. म्हणून ज्ञानदेव राम, कृष्ण म्हणण्याऐवजी आता विश्वात्मकें देवे अस म्हणतात. ज्ञानदेवांनी भक्ती संप्रदाय आणि नाथ संप्रदायाची सांगड घालून जगावर खूप मोठे उपकार केले आहे. त्यांनी आपल्याला अमृत पाजले आहे. या न्यायाने आपण अमृताचे पुत्र आहोत.

आता कोरोनाचा आपण विचार केला तर अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहे. पण जे काही होतं ते चांगल्यासाठी होत अशी सकारात्मक श्रद्धा ठेवायला आपली हिंदू संस्कृती शिकवते. म्हणजे पोजिटिव्ह आल्याने कोरोना होतो पण कोरोना झाल्यावर निगेटिव्ह होऊ नये.

म्हणून आपण या घटनेकडेही सकारात्मकतेने पाहिले पाहिजे. सावरकर आणि ज्ञानदेवांना जो त्रास सहन करावा लागला त्यापेक्षा आपला त्रास अगदीच कमी...

या कोरोना सेंटरमध्ये शांतपणे डोळे बंद करून बसल्यावर माझ्यासमोर ज्ञानदेवांची सालस मूर्ती उभी राहते. जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागणारी ती मूर्ती, जिच्यात स्वार्थाचा कणही नाही... आपण सगळेच एकदा ज्ञानदेवांची ती मूर्ती डोळ्यापुढे आणून विश्वाच्या ईश्वराला साद घालूया का?

पुढचे 10 - 15 दिवस मी स्वतःला जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहे. मुंबईच्या धकाधकीच्या जीवनात आपल्याला सगळे लोक दिसतात पण आपण स्वतः मात्र आपल्याला दिसत नाही. आता हे 10 - 15 दिवस स्व संवादाचे आहेत... आता हे दिवस मी ला मी शी भेट करून द्यायचे आहेत... मी म्हणजे कोण? ज्ञानदेवांनी त्या मी ला साद घालून म्हटले होते, आता विश्वात्मकें देवे....

दिनांक: ०२/०७/२०२०

बुद्धाच्या भेटीला कृष्ण, कृष्णाच्या भेटीला बुद्ध...

आज कोविड सेंटरमधून दोन रुग्ण बरे होऊन गेले. आम्ही सगळ्यांनी टाळ्या वाजवून त्यांच्या लढ्याला पाठींबा दर्शवला. इथे कुणी टाळ्यांची टिंगल टवाळी करत नाही. कारण या टाळ्या प्रत्येक जण स्वतःसाठी वाजवतो. बरा होऊन जाणाऱ्या रुग्णामध्ये तो स्वतःला पाहतो. माझ्यासाठीही लवकरच लोकांनी टाळ्या वाजवाव्यात अशी त्याची इच्छा असते.

कोरोनाशी लढताना तुमच्या कानावर सकारात्मक गोष्टी पडल्या पाहिजे आणि आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं सैनिकांना संबोधन करणारं भाषण ऐकलं. हिंदुस्थानी सैन्य चिनी सैन्याच्या विरोधात सज्ज झाले आहे आणि आपण इथे चिनी व्हायरसच्या विरोधात लढत आहोत. ते भाषण ऐकलं आणि आपणच सैन्य तुकडीचे एक घटक आहोत असं वाटलं. 70 वर्षांचा म्हातारा ज्याला जिग्नेश मेवाणी म्हणाला होता की मोदी को हड्डीया गलाने के लिये हिमालय जाना चाहीए. आज तो म्हातारा माणूस या वयातही आपली सकारात्मक ऊर्जा दाखवतोय आणि केवळ सैन्यालाच नव्हे तर देशाला बळ देतोय.

मोदींनी आज कृष्ण आणि बुद्धाचा उल्लेख केला. कृष्ण आणि बुद्ध हे भारताचे दोन रुप आहेत. नाण्याच्या दोन बाजू असतात तसे. एक काटा

आणि एक छापा... काटा म्हणजे परिपूर्ण शिक्का नव्हे आणि छापा म्हणजे परिपूर्ण शिक्का नव्हे. दोन्ही मिळून एक शिक्का होतो. तसंच कृष्ण आणि बुद्ध मिळून हिंदुस्थान बनतो. बाहेरच्या देशांना भारताने जी भुरळ घातली आहे ती याच कारणासाठी. शेकडो पंथ तरी हे हिंदू... हे कोणतं रसायन आहे? एकच इस्लाम आणि एकच ख्रिस्ती ही संस्कृती इथे नाही. इथे प्रत्येक माणसाच्या हातात स्वतःचा एक धर्मग्रंथ आहे. म्हणूनच तर इथे राम, कृष्ण, बुद्ध, चार्वाक, महावीर गुण्यागोविंदाने नांदू शकतात.

त्यात कृष्ण आणि बुद्धी ही दोन विरुद्ध टोके. सावरकर म्हणाले होते उद्या जर भारतामध्ये जगाला काही सांगण्याची क्षमता आली तर हिंदू कृष्ण आणि बुद्धाचे तत्वज्ञान सांगेल. सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणाऱ्या सावरकरांनाही बुद्धाचे तत्वज्ञान पटते. पण बुद्धाचे तत्वज्ञान युद्धात कामी येत नाही. तिथे कृष्ण लागतो आणि आपल्यामध्ये जे शत्रू दडलेत, आपली वाईट पवृत्ती, त्या शत्रूशी लढायला बुद्ध... बुद्धाची आणि येशूची मूर्ती मला खूप आवडते. त्या मूर्तीकडे पाहिलं की एक वेगळं समाधान लाभतं. येशूची मूर्ती पाहिली की त्याचा प्रचार करणाऱ्या मिशनरीची मला कीव येते. ह्यांना अजून येशू कळलेलाच नाही. येशू म्हणजे ममतेचं महासागर... या महासागराचं महत्व कळायला आधी भारतीय तत्वज्ञान शिकून घेणं खूप गरजेचं आहे... वसुधैव कुटुंबकम जाणून घेणं खूप गरजेचं आहे.

इथे कसे कृष्ण नि बुद्ध एकत्र नांदतात. तसे राम आणि येशू एकत्र नांदू शकतात. पण आमचं तत्वज्ञान मोठं हे सांगण्याच्या नादात खरा येशू मात्र खूप मागे पडला. असो... आता आपण पाकिस्थानला नमवलेलं आहे, भारतीय सैन्याचे रौद्र रूप पाहून चिनी पण भयभीत झाले आहेत. त्यात जगातले मोठमोठे देश आपल्यासोबत आले आहेत. चीनचं वर्चस्व लवकरच संपेल आणि आशिया खंडात भारत एक महत्वाचा देश होईल... नरेंद्र मोदी आज एक महत्वाच वाक्य म्हणाले, आम्ही बासुरीधारी कृष्णाची पूजा करतो आणि सुदर्शनधारी कृष्णाचीही पूजा करतो. कोणत्या वेळेला कोणता देव पुजायचा हे भारताला व्यवस्थित माहिती आहे. आता आपल्याला देशाबाहेरच्या, देशातल्या आणि आपल्याला कमजोर करणाऱ्या कोरोना नावाच्या शत्रू विरोधात लढण्यासाठी सुदर्शनधारी कृष्णाची पूजा करायची आहे... सध्या बुद्धाच्या भेटीला कृष्ण आलेला आहे... युद्ध जिंकलो किंवा संकट टळलं की कृष्णाच्या भेटीला बुद्ध येईल... बुद्धाला शरण गेलं की आपल्याला चराचरात बुद्ध दिसू लागतो. आपल्यावर गलिच्छ टीका करणाऱ्याचेही आपण हित चिंतीतो... महाराष्ट्र सरकारच्या चुकीच्या कारभारावर बोट ठेवल्यामुळे त्यांचे समर्थक माझ्यावर आणि माझ्या कुटुंबावर गलिच्छ टिका करत आहेत. पण इथे कोरोना सेंटरमध्ये बसून मला त्यांचा राग नाही येत, मला त्यांची दया येते. त्यांच्याप्रति माझी भावना म्हणजे दुरितांचे तिमीर जावो अशीच आहे... हीच बुद्धाची ताकद आहे...

बुद्धं शरणं गच्छामि
धम्मं शरणं गच्छामि
संघं शरणं गच्छामि

दिनांक: ०३/०७/२०२०

दुःख तुकोबांचे; मी कोरोना पोजिटिव्ह कसा झालो?

काही मित्रांनी मला न लिहिण्याचा सल्ला दिला. कोरोना झाल्यावर आराम करायचा. मी त्यांचं प्रेम समजू शकतो. पण मी एक वेळ अन्न पाण्याशिवाय जगू शकतो. लिहिल्याशिवाय जगू शकत नाही. माझ्या अगदी जवळच्या लोकांना हे माहीत आहे. ज्या दिवशी माझा या मर्त्यभूमीवरचा शेवटचा दिवस असेल आणि माझ्या संबंध आयुष्याचा आराखडा काढला तर मी दिवसाला किमान 1000 ते 1500 शब्द लिहिलेले असतील. म्हणून तुमच्या प्रेमळ सल्ल्याचा मी मान ठेवतोच, पण मला लिहिण्यापासून रोखू नका.

काही मित्रांनी मला कोरोना झाल्यापासूनचा अनुभव लिहायला सांगितला, जेणेकरून इतरांना बळ मिळेल. हा सल्ला मात्र मी शिरोधार्य मानणार आहे. थोडक्यात सांगतो आणि आजच्या मूळ विषयाला हात घालतो.

मी शक्यतो काळजी घेत होतो. माननीय मुख्यत्र्यांनी अनलॉक घोषित केल्यामुळे अनेक कंपन्या सुरू झाल्या. लोक लॉकडाऊनला जसे घाबरले होते तसे अनलॉकला पण घाबरले. कारण कामाला जाणं बंधनकारक होतं. मुंबईची लोकल बंद असल्यामुळे बसने प्रवास करणं स्वाभाविक होतं. मालाडहुन विरार वसईला किंवा तिथून या बाजूला बसने यायचं

म्हणजे 150/- येऊन जाऊन पडतात. माणूस 15 ते 20 हजार कमवत असेल तर त्याचे महिन्याचे बरेच पैसे जातात. त्यात कोरोना होण्याची भीती. पण इतके महिने घरी बसून खायचं काय? हा प्रश्न तर असतोच. जे तुपाशी खातात त्यांना हे पटणारं नाही. असो.

मला काही जणांनी तर मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून पुन्हा लॉकडाऊन जाहीर करण्याविषयी त्यांनी सांगितलं. त्यांची वेदना खरी असली तरी ते शक्य नव्हतं कारण माननीय मुख्यमंत्र्यांपर्यंत त्यांच्या मंत्र्यांनाच पोहोचता येते नाही असं आपण वाचलं असेल तर सामान्य माणूस कसा पोहोचेल. हे सगळं मी का सांगतोय कारण अनेक लोकांना दुरून डोंगर साजिरं दिसतं. सर्वसामान्य माणूस कोणत्या दुविधेतून जात असतो याचं त्यांना भान नसत. आपल्या बंगल्याच्या किंवा फ्लॅटच्या खिडकीतून त्यांना जेवढं जग दिसतं तेवढंच जग पाहण्याची अनेकांना सवय असते. पण तुम्ही कितीही उंच भरारी घेतली तरी तुमचं मातीशी घट्ट नात असेल तरच सामान्य लोकांचे प्रश्न तुम्हाला दिसतील...

जेव्हा मी उध्दवजींवर लेख लिहिला होता तेव्हा सरकारच्या समर्थकांनी अशी टीका केली की उध्दवजींवर टीका करण्यासाठी बापाला मुद्दामून कोरोना पॉजिटिव्ह केलं म्हणजे ते बरे आहेत उगाच भांडवल केलं. काहींनी म्हटलं की बाप हॉस्पिटलमध्ये असताना हा टीका करतोय, काही म्हणाले की लॉकडाऊन असताना बाहेर का निघालास? मुळात त्या लेखाचा आणि बाबा पॉजिटिव्ह असण्याचा मुळीच संबंध नाही.

आता त्यांच्या या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी हे लिहिल आहे की सामान्य माणूस कोणत्या परिस्थितीतून जातोय. आज जर राष्ट्रीय स्वयंसेवक आणि अशा असंख्य सामाजिक संघटना नसत्या तर सामान्य माणूस उपाशी मेला असता. हे खिडकीतून जग बघणार्यांना नाही कळणार. सामान्य माणसाला कळेल जो भोगतोय, आणि त्याला कळेल जो रस्त्यावर उतरून लोकांची सेवा करतोय.

तर बाबा वसईला कंपनीत कामाला गेले आणि तिथेच राहिल्यामुळे आजारी पडले आणि घरी आले तसे खूप अस्वस्थ होते. मी, बायको आणि मुलगा भाड्याने दुसरीकडे राहतो म्हणून सेफ होतो. फॅमिली डॉक्टरांनी बाबांची ब्लड आणि कोरोना टेस्ट करायला सांगितला. ती केल्यावर ब्लड रिपोर्ट आधी आला, तेव्हा कळलं की बाबांची किडनी बऱ्यापैकी डॅमेज झालीय. त्यांना हॉस्पिटलला ऍडमिट करावं लागेल. मी माझे गुरुसमान मित्र किशोर नार्वेकर यांना फोन केला, त्यांनी केईएममध्ये जायचा सल्ला दिला. ते देवासारखे धावून आले. ऍम्ब्युलेन्स मिळत नव्हती म्हणून मित्र प्रशांत पेंढारेला फोन केला तोही देवासारखा धावून आला. त्याच्या कारमधून आम्ही रात्री 12 च्या दरम्यान केईएमला गेलो. तिथे सगळया टेस्ट वगैरे आणि प्रोसिजर करेपर्यंत दुसरा दिवस उजाडला आणि सकाळी 11.30 च्या दरम्यान बाबाना ऍडमिट केलं. त्याच्या दुसऱ्या दिवशी कोरोनाचा रिपोर्ट आला आणि ते पॉजिटिव्ह निघाले. तेव्हाच मी समजलो की आमची सगळी फॅमिली पॉजिटिव्ह असणार. एक सुजाण नागरिक म्हणूनमी मी

बीएमसीला कॉल केला आणि qurantine करायला सांगितलं. आम्ही चाळीत राहतो म्हणून, संडास कॉमन म्हणून. आम्ही लगेच एका फ्लॅटमध्ये qurantine झालो. तिथे आमची टेस्ट केली तेव्हा रिपोर्ट पॉजिटिव्ह आले आणि अशाप्रकारे आम्ही कोरोनाग्रस्त.

जी मंडळी बोलत होती की लॉकडाऊनमध्ये कशाला बाहेर मरायला गेलास. तर मी मरायला नव्हतो गेलो, बाबांना ॲडमिट करायला गेलो होतो आणि मुख्यमंत्री साहेबांनी अनलॉक जाहीर केला असल्यामुळे, लॉकडाऊनही नव्हता. कोरोना तुम्हाला कसाही होऊ शकतो. असो. पण मी स्वतः रुग्ण असल्यामुळे सल्ला देईन की तुम्ही मुळीच घाबरू नका आणि आपल्या दुःखाचा बाऊ करू नका. लोकांना दुःखाचा बाऊ करायची सवय असते... पण कोरोना झाल्यावर घाबरायचं कारण नाही. साधा ताप खोकला येतो त्याच दृष्टिकिनातून त्या चिनी व्हायरसकडे पाहायचं. त्याला आपल्यावर हावी होऊ द्यायचं नाही. कोरोना अजून तरी माझ्यावर हावी झालेला नाही आणि तुमच्या आशीर्वादाने त्याला लवकरच हाकलून लावून परत येईन.

दुःखावरून एक गोष्ट आठवली. माझी जन्मठेपेमध्ये सावरकरांनी कैद्यांच्या उन्मत्त हसण्याबद्दल लिहिलंय... माणूस दुःखी असेल तेव्हा तो हसतो. त्याला उन्मत्त हसणं म्हणतात. सावरकर काही उदाहरणे देतात. फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या वेळी अमानुष हत्या, कत्तली होत होत्या. तेव्हा तिथे नाट्यगृहे भरलेली असायची... आज जगायचं आणि

उद्या मरायचं अशी अवस्था होती. मारायच्या आधीची पार्टी, ते विद्रुप हास्य... ते भयाण दुःख... महायुद्धात जर्मन पाणबुड्यांवरच्या अधिकाऱ्यांना व सैनिकांना भयंकर सेवा करायला लागत होती. हातात शीर घेऊन समुद्रात उडी घ्यावी लागे. आपणही किती काळ जिवंत राहू याची शाश्वती नव्हती. जेव्हा या सैनिकांना विसावा करायला मिळे, तेव्हा त्यांना भोग घेण्यासाठी विहारे उभारलेली होती. ते तिथे यायचे व सर्व भोग घ्यायचे... "Enjoy till thou goes mad. Enjoy. For tomorrow we die" हे त्यांचं ब्रीदवाक्य होतं... आपल्याच मरणाचा सोहळा ते करत होते. आता आपण भारतात येऊ...

भारतीय संस्कृतीचा आढावा घेतो तेव्हा मला तुकोबांचे दुःख जवळचे वाटते. तुकोबांच्या चरित्रात दुःख आहे... पण समर्थ रामदास म्हणतात त्याप्रमाणे हे स्वतःचे दुःख नसून चिंता करितो विश्वाची असे आहे... विश्व म्हणजे आपले जग नव्हे तर आपल्यामध्येच असलेली जाणिवेची खोली असं निरूपण यशवंत पाठक यांनी केलं आहे... सर्व सामान्य माणसाची जाणिवेची खोली बंद असते. सतपुरुष साधनेच्या वा पराकोटीच्या सकारात्मकतेच्या मार्गाने ते दरवाजे उघडतात. म्हणून सत्पुरुषांच्या दुःखात स्वार्थ नसतो. आपण सामान्य माणसं, आजच्या युगात तुकोबा, ज्ञानोबा होणे आपल्यासाठी कठीण आहे. काही 5 ते 6 % जरी आपण तिथे पोहोचू शकलो तरी आपल्या जीवनाच सार्थक झालं समजा... दुःख असावे तर तुकोबांसारखे... सतत समाज कल्याणाची आस आणि विठ्ठलाची ओढ... ही शक्ती तुकोबांना नक्कीच त्यांच्या

पूर्वसूरींकडून म्हणजेच ज्ञानोबा माऊलींकडून मिळाली असणार.

आता कोरोना असो किंवा अजून काही दुःखाचा बाऊ करू नये... सुखाला कवटाळले तर दुःख आलं तरी आपल्यावर हावी होत नाही... मला माझ्या एका गुरूंचा फोन आला होता, त्यांनी माझी ख्याली खुशाली विचारली आणि ते वृद्ध असल्यामुळे त्यांनाही भीती वाटत असल्याचं त्यांनी प्रामाणिकपणे सांगितलं. पण कोरोनावर धाडसाने आणि आनंदाने आणि सकारात्मक वृत्तीनेच मात करता येते... कारण त्या बिचाऱ्या चिनी व्हायरसवर अजून औषध निघालेले नाही. आपल्याकडे आपल्या पूर्वजांच्या उपदेशांचा साठा आहे. आपण भाग्यवान आहोत, तुकोबांसारखा महापुरुष इथे जन्मला... मग घाबरायचं कशाला... माऊली काय म्हणतात,

रूप पाहतां लोचनीं ।
सुख जालें वो साजणी ॥
तो हा विठ्ठल बरवा ।
तो हा माधव बरवा ॥
बहुतां सुकृतांची जोडी ।
म्हणुनि विठ्ठलीं आवडी ॥
सर्व सुखाचें आगर ।
बाप रखुमादेवीवरू ॥

दिनांक: ०४/०७/२०२०

गुरूला शरण जावे...

विवेकानंदांनी गुरू पारखून निवडला... बऱ्याचदा गुरू शिष्य निवडतो. पण इथे तर गुरू इच्छुक असतानाही विवेकानंद सहजासहजी शिष्य व्हायला तयार नव्हते. त्यांनी आधी रामकृष्ण परमहंसांना पारखलं आणि मगच त्यांचा स्वीकार केला. ही संधी प्रत्येकालाच मिळत नाही. पण गुरूचा स्वीकार केल्यानंतर ते कालांतराने गुरूला शरण गेलेले आहेत...

एक गोष्ट आठवतेय... एक गुरू होते, संन्याशी... त्यांचा शिष्य व्हायचं असेल तर ब्राह्मचार्याची शपथ घ्यावी लागे. कडक ब्रह्मचर्य ते पाळत. आपल्या शिष्याना उपदेश करताना म्हणत की स्त्रीपासून दूर राहिलं पाहिजे. स्त्रीचा स्पर्श सुद्धा टाळायचा. अध्यात्मिक उत्थानाचा तो काळ होता. आता हे ऐकायला विचित्र वाटलं तरी पूर्वी अनेक लोक अध्यात्माकडे वळत होते. त्यांचे शिष्य त्यांनी शिकवलेल्या मार्गावरून चालत होते. जगातली प्रत्येक की ही आपली आई किंवा बहीण हा संदेश ते पाळत होते.

एकदा दोन तीन शिष्याना घेऊन गुरुदेव एका गावी प्रवचनासाठी जात होते... शिष्यानी गुरुंच सगळं सामान उचललं होतं. चालता चालताही गुरुदेव उपदेश करत होते. "स्त्री चा सहवास ब्राह्मचाऱ्यासाठी त्रासदायक. कधीही मोह होऊ शकतो. म्हणून स्त्रीला दुरूनच नमस्कार करावा.

अध्यात्मिक प्रगतीमध्ये स्त्रीचा अडथळा नसावा"... शिष्य हे उपदेश ग्रहण करत होते... पुढे एक नदी होती आणि नदीच्या किनाऱ्यावर एक 20 वर्षांची अतिशय सुंदर मुलगी बसली होती. शिष्यांच तिच्याकडे लक्ष गेलं... ती इतकी सुंदर होती की तिला पाहून कुणालाही इच्छा होईल, मोह होईल... शिष्यानी नजर दुसरीकडे वळवली. तशी ती त्यांच्या जवळ आली आणि म्हणाली, "मला पलीकडे जायचंय... ही नदी पार करत येत नाही. तुम्ही मला नदी पार करायला मदत कराल?" गुरू शांत उभे होते. शिष्यांनी विचार केला की नदी पार करायची म्हणजे हिला उचलावे लागणार, तिच्या कोमलांगाचा स्पर्श होणार. मोह होणार, गुरुदेव रागावतील. त्या शिष्यांनी तिला सरळ नकार दिला. तशी ती गुरुदेवांकडे गेली आणि विनवणी करू लागली. गुरुदेवांनी क्षणाचाही विलंब केला नाही आणि सरळ तिला कमरेत विळखा घालून उचललं आणि नदीतून चालू लागले. तिला उचलल्या बरोबर शिष्य आश्चर्यचकित झाले.

गुरुदेव नेहमीप्रमाणे अध्यात्माचे उपदेश देत त्या सुंदर ललनेला उचलून चालत होते. मागून त्यांचे शिष्य चालत होते आणि विचार करत होते की गुरुदेव आम्हाला स्त्रीपासून दूर रहा म्हणतात आणि स्वतः थेट उचलूनच घेतात. नदी पार झाली. त्या लावण्यातीला गुरुदेवांनी खाली उतरवलं. तिने गुरुदेवांचे आभार मानले आणि नमस्कार करून ती निघून गेली...

गुरुदेव आणि शिष्य गावी पोहोचले... गुरुदेवांचं प्रवचनही नेहमीप्रमाणे

रसाळ झालं. रात्री एका कुटीमध्ये आराम करत असताना शिष्य थोडे नाराज दिसले म्हणून गुरुदेवांनी त्यांना विचारलं की "काय रे पोरांनो काय झालंय?" शिष्यांची हिंमत होईना सांगायची. पण एकाने हिंमत करून विचारलं, "गुरुदेव तुम्ही आम्हाला स्त्रीपासून दूर राहायला सांगता आणि स्वतः मात्र त्या कोमल ललनेला उचलून घेतलं". गुरुदेव हसले आणि म्हणाले "मी तर तिला उचलून घेतलं आणि नदी पार करून सोडूनही दिलं. पण तुम्ही मात्र अजूनही तिला उचलून आहात..." या उत्तराने शिष्य खजील झाले... त्यांना गुरुदेवांच्या बोलण्याचा सार कळला.

म्हणून गुरूंना शरण गेलं पाहिजे. गुरू जे सांगतात त्याचा गर्भितार्थ कळला पाहिजे. आपण आपल्या मनाने अर्थ काढता कामा नये... जसं रामकडे 2 आंबे होते, त्यातला एक आंबा त्याने श्यामला दिला तर रामकडे किती आंबे उरले? अशाप्रकारे गणित लहानपणी आपल्याला शिकवले जायचे. या गणितात राम, श्याम आणि आंबे महत्वाचे नसून 2 वजा 1 बरोबर 1 हे गणित महत्वाचं आहे. लहान मुलांना कळण्यासाठी आणि इंटरेस्ट निर्माण होण्यासाठी त्यात राम, श्याम आणि आंबे आले. गुरूंसाठी शिष्य हे बालकच असतात. सांगायचं तात्पर्य गुरूंना पूर्णपणे शरण गेलं पाहिजे. त्याशिवाय गुरूंचा उपदेश कळणार नाही.

आज डॉ. परीक्षित शेवडेंनी कोविडला गुरू म्हणून उद्देशून एक पोस्ट

लिहिली आहे. काही लोकांना ती गंमतीदार वाटली. पण मला ती खूप सिरीयस पोस्ट वाटतेय. कोविडने आपल्याला खरच खूप काही शिकवलंय... दोन शब्दात कोविडने कोणती शिकवण दिली असेल तर ती म्हणजे निसर्गाकडे चला... आपण जेवढे नैसर्गिक होऊ तितकेच सुरक्षित राहू... आज कोरोना सेंटरमध्ये गुरुपौर्णिमा वाचन आणि चिंतन करण्यात गेली... आज मी या स्थितीपर्यंत पोहोचलोय, ते मला घडवणाऱ्या सर्व गुरूंमुळेच... ते नसते तर मी घडलोच नसतो... दत्तगुरूंनी प्रत्येक गोष्टीला गुरू मानलं... परिस्थिती सुद्धा गुरुच आहे... मी सुद्धा खूप काही शिकत असतो रोज. आयुष्यभर विद्यार्थीच राहायचं आहे... खूप काही शिकायचं आहे, खूप काही मिळायचं आहे, स्वतःच्या उन्नतीसोबत देशसेवाही करायची आहे... तुम्हा सर्वांचे आणि माझ्या सर्व गुरुजनांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी आहेत... "कितीरूपे उरावे" ही शिकवण मी कधीच विसरणार नाही... माझ्या सर्व गुरुदेवांना माझा साष्टांग दंडवत...

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुरेव परंब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः।।

दिनांक: ०५/०७/२०२०

कशासाठी? पोटासाठी...

आज कोरोनाच्या कहरामुळे अनेकांसमोर आर्थिक प्रश्न उभा राहिलेला आहे. अनेक लोकांची मानसिक स्थिती चांगली नाही. आर्थिक स्थिती चांगली नसेल तर मानसिक स्थितीही बिघडते... मी, तुम्ही सगळेच या परिस्थितीतून जात आहोत. लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर अनेक स्वयंसेवी संस्था पुढे आल्या आणि लोकांना त्यांनी ध्यान्याचं वाटप केलं. या स्वयंसेवी संस्था आणि त्यांचे स्वयंसेवक नसते तर परिस्थिती अजून खालावली असती. आता काही दिवसांपूर्वी मोदींनी अजून काही महिने गरीबांना धान्य वाटप करणार असल्याचे घोषित केले आहे म्हणून गरीबांच्या जीवात जीव आला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही याबाबतीत समाधान व्यक्त केले आहे.

कोरोनाने आपल्याला बरंच काही शिकवलं आहे. कोरोनाने आपल्याला माणुसकी शिकवली आहे... या परिस्थितीतही काही लोकांनी बाजार मांडला आणि प्रायव्हेट हॉस्पिटल्स कशाप्रकारे लूट करतायत हे आपण पाहतोच आहोत. सरकारने किमान या काळात तरी प्रायव्हेट हॉस्पिटल्सवर नियंत्रण ठेवून दर कमी करायला सांगितले पाहिजे. कालच एका फेसुबक मैत्रिणीचा मेसेज आला. तिच्या बाबांना सरकारी हॉस्पिटलमध्ये बेड उपलब्ध नसल्यामुळे प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये भरती करावं लागलं. 1 लाखापेक्षा जास्त पैसे घेऊन भरती करता आलं. सामान्य माणूस कुठून आणणार इतके पैसे? त्यात रुग्णाने 20 ते 25

दिवस रुग्णालयात काढले तर राहतं घर विकावं लागेल.

कोरोनाच्या या संकटात अनेक कार्यकर्ते जीव मुठीत घेऊन काम करताना पाहिले असतील... बरखा दत्त यांनी स्वतः अशा संघ कार्यकर्त्यांची रिपोरटिंग केली आहे. कोण आहेत हे कार्यकर्ते? काय नातं, आपलं नि त्यांचं? का ते आपल्यासाठी झटतात? मी ज्या कोविड वॉर्डमध्ये ॲडमिट आहे तिथे काही दिवसांपूर्वी असेच संघाचे कार्यकर्ते ॲडमिट होते... अत्यप्रकाश मिश्र, किशोर लटू, विशाल मुणगेकर व त्यांचे सहकारी... त्यांनी bmc च्या मास स्क्रिनिंगमध्ये भाग घेतला होता आणि लोकांची सेवा करताना ते कोविड पॉजिटिव्ह आले...

या सगळ्या स्वयंसेवी कार्यकर्त्यांचं आपल्यासाठी झटण्याला इतिहास आहे. इतिहास म्हणा किंवा रूपक कथा... काही नाव द्या, त्याने काही फरक पडत नाही. एकदा ब्रह्मदेवाने त्याच्या पुत्रांना जेवायला बोलवलं. सगळं स्वादिष्ट पक्वान्न... तीन गट होते मुलांचे... ब्राहदेवाने जेवणापूर्वी अट घातली. आपण जसा हात फोल्ड करून तोंडात घास घेतो तस नाही जेवायचं, हात दुमडायचा नाही. मुलं म्हणाली हात दुमडला नाही तर घास कसा घ्यायचा. ब्रह्मदेव म्हणाले ते तुमचं तुम्ही बघा. मी सांगितलं तो नियम पाळायचा...

मुलांच्या एका गटाने विचार केला आणि कुत्री मांजरी कशी जेवतात, तोंड लावून, तसे जेवायला लागले. ब्रह्मदेवाने शाप दिला आणि ती मुलं

जवानरं झाली... दुसऱ्या गटाने विचार केला की पिताश्री शाप वगैरे देतात, त्यापेक्षा आपण या भोजनावर बहिष्कार टाकूया... आंदोलन करूया... ब्रह्मादेवाने शाप दिला... आजपर्यंत ही जमात आंदोलन करतेय. आपल्याकडे एक जमात आहे. ती काही कामे करत नाही, काही घडवत नाही. पण सतत विरोध करत असते... हमे चाहीए आझादी वगैरे वगैरे... आजकाल नेते असेच घडतात... केला विरोध, झाला नेता... पी हळद नि हो गोरी तसं कर विरोध नि हो नेता अशी परिस्थिती आहे... पण या लोकांना कामे करायला सांगितली तर पळ काढतात...

तिसऱ्या गटाने खूप विचार केला. हात फोल्ड न करता आपण जेवूच शकत नाही. पण पिताश्रीनी सांगितलंय म्हणजे त्यात काहीतरी तथ्य असेलच ना? मग एकाने घास उचलला आणि सरळ हात ठेवून दुसऱ्याला भरवला, दुसऱ्याने पहिल्याला भरवला... अस करत करत सगळे पोटभर जेवले... ब्रह्मदेवाने आशीर्वाद दिला आणि एक समाज निर्माण झाला... एकमेकांसाठी झटणारा समाज.

आज जे स्वयंसेवी कार्यकर्ते आपण पाहतोय ती साक्षात ब्रह्मदेवाची लेकरे आहेत... माणसामध्ये आणि प्राण्यामध्ये मूळ अंतर जर काही असेल तो हाच आहे... माणूस आणि प्राणी कशासाठी जगतात? पोटासाठी जगतात... पण प्राणी फक्त स्वतःच्या पोटाचा विचार करतात, माणूस स्वतःच्या पोटाचा विचार करतोच त्यासोबत तो

दुसऱ्याच्या पोटाचाही विचार करतो. म्हणूनच आपण माणसे आहोत आणि जी माणसे दुसर्यांना मारून, दुसऱ्यांचे पोट मारून लुबाडतात, ती माणसे होण्याच्या लायकीची नसतात... माणूस तोच जो स्वतःसोबत दुसर्यालाही घास भरवू शकतो...

आज समाजासाठी झटणारी माणसं पहिली की जगात माणुसकी अजूनही शिल्लक असल्याची जाणीव होते आपल्याला. इथे कोविड वॉर्डमध्ये तर डॉक्टर कर्मचारी पीपीई किट घालूनही आम्हा कोरोनाग्रस्तांपासून 4 हात दूर असतात. मी पहिल्यांदा इथे आलो तेव्हा सर्वात आधी माझं तापमान तपासण्यात आलं. सध्या बंदुकीसारखं उपकरण आहे तापमान तपासायचं... म्हणजे रुग्णाला हात न लावताही, तुम्ही तापमान तपासू शकता. तर त्या माणसाने जवळ जवळ 5 फूट दूर उभं राहून माझं तापमान तपासलं. सगळे कोरोनाला इतके घाबरले आहेत. अशा परिस्थितीत हे स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते आपल्यासाठी झटत आहेत... त्या सर्वांना मनाचा मुजरा... आपण जगायचं, कमवायचं कशासाठी? पोटासाठी... पण केवळ स्वतःच्याच नव्हे तर दुसऱ्यांच्याही...

दिनांक: ०६/०७/२०२०

प्रियकर मुला...

आज पाच दिवस झाले आम्ही आमच्या मुलापासून दूर आहोत. अजून 5 दिवस इथे कोविड सेंटरमध्ये काढायचे आणि quarantine केलं तर अधिक 7 दिवस म्हणजे अजून 12 दिवस त्याच्यापासून दूर राहाव लागेल... आम्ही अधूनमधून फोनवर आणि व्हिडीओ कॉलवर बोलतच असतो. पण आपल्या मुलांना मिठी मारण्यात जे सुख असतं ते स्वर्गातल्या अप्सरेच्या मिठीतही मिळणार नाही...

पूर्वी बाबा म्हटले की स्ट्रिक्ट असायचे... आता जवळ जवळ सगळे बाबा दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे मधले अनुपम खेर झालेत... गोड... मला जयोस्तुचा जन्म अजूनही आठवतो... जेव्हा नर्सने पहिल्यांदा त्याला मला दाखवलं होतं... गोरा गोरा पान... अगदी एखाद्या प्रेषितासारखा वाटत होता... सुरुवातीला त्याला उचलून घ्यायला खूप भीती वाटायची... ते नाजूक बाहुलं, आपल्यामुळे त्याला काही इजा झाली तर? मन थरथरायचं... पण नंतर मात्र भीती नाहीशी झाली. एक बेजबाबदार तरुण ते एक जबाबदार बाप असा प्रवास सुरु झाला... जयोस्तुने आम्हाला खूप सुख दिलंय, हे सुख दैवी आहे... हळूहळू तो मोठा होतोय. बघता बघता दिवस सरतील आणि कळणारच नाही की कुशीत शिरणारं आमचं एवढूसं बाळ दाढी मिश्यावाला बाप्या झाला... ती वेळ यायला अजून बराच काळ बाकी आहे... पण ज्यांच्या आयुष्यात ती वेळ आली असेल त्यांना काय भारी वाटत असेल ना? मुळात तो ईश्वर

म्हणा, निसर्ग म्हणा किंवा विज्ञान म्हणा... नाव काही द्या, पण त्याचा चमत्कार तो केवढा... आपल्यामुळे एक जीव जन्माला येतो, ही कल्पनाच किती भन्नाट आहे...

जगाच्या पाठीवर कोण आहोत आपण? काय कुवत आपली या विशाल ब्राह्मांडासमोर? या विशाल ब्राह्मांडाच्या विशाल पृथ्वी नावाच्या ग्रहात विशाल आशिया खंडाच्या भारत नावाच्या मोठ्या देशात, महाराष्ट्रातील मुंबईत, त्यातही मालाड, त्यातही आपला लहानसा विभाग... त्या विभागात राहणारा मी एक सामान्य जीव... पण विश्वाच्या ईश्वराने एक नवा जीव निर्माण करण्याची क्षमता आपल्याला दिली... किती अद्भुत आहे सगळं... आपण नेहमी कोणत्या ना कोणत्या चमत्काराच्या प्रतीक्षेत असतो... पण यापेक्षा मोठा चमत्कार काय असेल... माणूस जन्म घेतो आणि मरण पावतो... कळ्या येतात, फुलतात नि कोमेजतात... फुलं ईश्वराला वाहिली की निर्माल्य होतात. एरव्ही त्यांना आपण कचराच म्हणू... कोण कशासाठी उपयोगी पडतं त्यावरून त्याची पात्रता ठरते... सूरी गुंडांच्या हातात केली की जीव घेते, वैद्याच्या हातात गेली की जीव वाचवते...

प्रत्येक आई वडिलांना वाटत असतं की आपल्या मुलाने खूप मोठं व्हावं... आपण ज्याच्यावर जळत नाही किंवा खार खात नाही अशी एकच व्यक्ती, आपलं मूल... जगात कुणी आपल्या पुढे गेलं तर आपल्याला त्रास होतो, आपण त्याला पाण्यात पाहतो... पण प्रत्येक

आई बापाला वाटतं की आपल्या मुलाने आपल्यापेक्षा 100 पावलं पुढे असावं... पापा कहते है बेटा बडा नाम करेगा वगैरे वगैरे...

स्वामी विवेकानंदानी अमेरिकेत खूप नाव कमावलं... गोरे लोक वैदिक तत्वज्ञानाचे दिवाणे झाले... भारत हा मदारींचा देश नसून संत महात्म्यांचा देश आहे हे स्वामीजींनी बिंबवून सांगितलं... स्वामी विवेकानंद आपल्या वाणीने पाश्चात्य जग जिंकून भारतात आले तेव्हा ते त्यांच्या आजीकडे म्हणजे आईच्या आईकडे उतरले... त्यांना भेटायला त्यांची आई तिथे आली होती... इतक्या वर्षांनंतर मायलेकाची भेट होणार होती... त्या माऊलीचा मुलगा बदलला होता, एक वेगळंच तेज त्याच्या चेहऱ्यावर झळकत होतं... त्याचं नाव जिकडे तिकडे पसरलं होतं... आईला पाहून स्वामींनी वाकून नमस्कार केला. आईच्या डोळ्यात अश्रू तरळले, ती म्हणाली "मुला, तुला आशीर्वाद देऊ की तुझे आशीर्वाद घेऊ?"...

हा क्षण माझ्याही आयुष्यात यावा अशी माझी इच्छाच नव्हे तर श्रद्धा आहे. मला ठाऊक आहे, प्रत्येकाला असच वाटत असणार. आपल्या मुलाने जग जिंकाव... मी संन्यासी होण्याबद्दल नाही बोलत... आपल्या मुलांनी त्यांच्या क्षेत्रातला विवेकानंद व्हावं...

इथे कोरोना सेंटरमध्ये कंटाळवाणं आणि अस्वच्छ जीणं जगताना, बाबा रुग्णालयात प्रचंड सिरीयस असताना... लेखन, सावरकर, मोबाईल

वगैरे वगळता सर्वात जास्त आनंद देणारी गोष्ट म्हणजे जयोस्तुसोबत फोनवर बोलणं... ही काय केवळ माझी भावना नाही... मी केवळ प्रतिनिधी आहे, जगातल्या तमाम आईवडिलांचा.... मला खात्री आहे मी तुमच्या मनातले शब्द इथे लिहितोय... मी माझ्या जयोस्तुवर एक कविता लिहिली आहे... ती तुमच्यासमोर ठेवतो आणि या लेखाला पूर्णविराम देतो... जगातल्या सर्व लेकरांना लब्यु... तुम्हा मुलांमुळेच आम्हा पालकांचं जग स्वर्ग झालंय...

एक प्रिय ती मायभू, दुजा जीवलग तू.
श्वास किती ओवाळू, माझे जीवन तू.

तेवतो मनात क्षण आजही, पाहिले प्रथम तुला.
इंद्रपद ते क्षुद्र भासले, तुझ्यापुढे रे माझ्या फुला.
जणू अवरतला प्रेषित ज्यावरूनी, प्रणयाचा रे झुला.
अश्रू सुमानांनी स्वागत केले, माझ्या प्रियकर मुला.

तुझे कोवळे बोबडे बोल, दरवळले वाऱ्यासवे.
उठुनी पडतो, पडुनी उठतो, गोड आठवणींचे थवे.
जे जे म्हणतो नको, ते ते तुज का रे असते हवे?
डटावूनी काही सांगता, डोळ्यांतून वाहे आसवे.

बालगोपाळांचा मेळा, अल्लड चंचल कृष्णलीला.

जिथे जातो तिथे मांडतो, खेळ-खेळण्यांचा ठेला.
बाळ जयोस्तु याद राख, भूमातेसाठी तव यत्न केला.
माय सिंधू रोज प्राशिते, तव विरह यातनांचा पेला.

हा शब्द प्रपंच तुला देईल लेका बळ त्यामागे.
वीर शिवाजी जेव्हा उठला, गनिम भयभीत भागे.
मायभूसाठी प्रपंचाची चूल, सुख यौवन त्यागे.
उतरेल कोटी हिंदू सेना, शूर जयोस्तु आगे.

माझा शिव, माझा बाजी, माझा कृष्णराम तूच तू.
एक प्रिय ती मायभू, दुजा जीवलग तू.
श्वास किती ओवाळू, माझे जीवन तू.

दिनांक: ०७/०७/२०२०

आत्मा अमर आहे...

काल बाबा गेले... कालचा लेख लिहून पूर्ण झाला, पोस्ट केला आणि बातमी कळली... 8 - 9 दिवसांपूर्वी त्यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट केलं तीच आमची शेवटची भेट... आज त्यांच्यावर शासकीय पद्धतीने अंतिम संस्कार झाले. दुःखाची गोष्ट म्हणजे त्यांचे अंतिम दर्शनही घेता आले नाही. कालपासून अनेकांचे फोन, मेसेज येत आहेत... आज फेसबुकवर माझे बाबा गेल्याचे अनेक पोस्ट्स पहिल्या. तुम्ही सगळे माझ्यावर इतकं प्रेम करता याबद्दल मी तुमचा मनापासून आभारी आहे. सर्वांना वैयक्तिक रिप्लाय देणं शक्य नाही याबद्दल क्षमस्व.

या अनुशंगाने काही स्पष्टीकरण देणं गरजेचं आहे. मी जो लेख लिहिला होता तो माझ्या पतिस्थितीवर, मी उपचार घेत असलेल्या किंवा बाबा उपचार घेत आलेल्या हॉस्पिटलवर टीका करणारा नव्हता... त्या लेखात असा एकही शब्द नाही. मी त्यात माझं दुःख वगैरे मांडलं नव्हतं. केवळ बाबा उपचार घेत आहेत अशा परिस्थितीत राजकीय टीका करणार नाही असं ठरवलं होतं, पण महाराष्ट्राची अवस्था पाहून न राहून घेत लिहितोय अशा प्रकारचा उल्लेख मी केला होता. हे सर्वांनी कृपया लक्षात घ्यावं. दुसरी गोष्ट बाबा उपचार घेत असताना राजकीय लेख लिहिला म्हणून टीका झाली, अगदी खालच्या दर्जाची. त्यांचं म्हणणं होतं की बाबा आजारी असताना राजकीय पोस्ट्स करू नये. मग त्यांच्या मते सचिन तेंडुलकर यांचे बाबा वारल्यावर त्यांनी लगेच

क्रिकेट नको खेळायला, जॉनी लिव्हर यांचे बाबा वारले तेव्हा सगळ्या विधी पूर्ण करून ते शुटिंगला गेले आणि नेहमीप्रमाणे उत्तम विनोदी सीन दिला, आधी लगीन कोंढण्याचं... या सगळ्या गोष्टीत कर्तव्य आहे. एक लेखक आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून अशा हालाकीच्या परिस्थितीत मी माझं कर्तव्य पूर्ण केलं. हे एवढंच स्पष्टीकरण मला द्यायचं होतं. यापुढे या लेखात आणि पुढे काही दिवस मी या विषयावर बोलणार नाही. काही लोकांनी मला विचारलं की तू तुझ्यावर गलिच्छ टीका करणाऱ्यांवर केस करणार आहेस का? तर नाही, मी त्या सर्वांना माफ केलंय. एकतर ते मानसिकदृष्ट्या सक्षम नाहीत आणि दुसरी गोष्ट म्हणजे ते सगळेच सर्वसामान्य लोक आहेत, आपल्यासारखे. आपण केस केली आणि ते अडकले तर त्यांचे साहेब त्यांना सोडवायला येणार नाही. उगाच त्यांचं आयुष्य खराब व्हायचं... देशभक्तीच्या मार्गावरून चालताना कुणाचेही वाईट चिंतणे हे माझ्या तत्वात बसत नाही आणि अस केलं तर शिवाजी महाराज आणि सावरकर मला माफ करणार नाहीत. त्यामुळे विश्वेश्वराकडे मी त्यांच्यासाठी "जे खळांची व्यंकटी सांडो. तयां सत्कर्मी रती वाढो". एवढीच प्रार्थना करेन...

बाबांना अनेक दिवस पाहिलं नाही आणि त्यांचं अंतिम दर्शन झालं नाही, त्यात त्यांना अग्नी देण्याचा अधिकारही मला मिळाला नाही. पण ही शासकीय पद्धत लोकांच्या भल्यासाठीच आहे. इथे कोरोना वॉर्डमध्ये कळलं की शताब्दी हॉस्पिटलमध्ये एकाने प्रेत मिळवण्यासाठी भांडण केलं. मी त्यांना एवढंच सांगेन की अशा बाबतीत शासनाला आपण

सहकार्य केलं पाहिजे. हे केवळ आपल्यासोबत घडत नाही तर जगामध्ये घडतंय. त्यामुळे एकमेकांना समजून घेणं या काळात अत्यंत गरजेचं आहे.

कालपासून सांत्वन करणारे अनेक मेसेज व फोन आले... अनेकांनी सांगितलं की तू खंबीर आहेस, सावरकरवादी आहेस, तू सांभाळून घेशील सर्व... खरंय... पण माणूस म्हणून कुठेतरी तुम्ही हलतातच...
सावरकरांची एक आत्मबल नावाची सुंदर कविता आहे... अनादी मी अनंत मी अवध्य मी भला. मारील रिपू जगती असा कवण जन्मला...
बाबांची बातमी कळली आणि या काव्यचे एकदा मनातच पठण केले...
आत्मा अमर आहे ही हिंदू धर्माची अत्युत्तम शिकवण आहे. जीवन आणि मृत्यूचं कोडं कृष्ण सहज सोडवतो. "जिवाच्या भेटीला शिव येतो ते जीवन आणि शिवाच्या भेटीला जीव जातो तो मृत्यू"... बाबा शिवाच्या भेटीला निघून गेले. त्यांच्या आत्म्यास सदगती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

कालच मी जन्म देणे ही सुंदर संकल्पना आहे असं लिहिलं होतं. मृत्यू ही क्लेशदायक संकल्पना असली तरी तो अटळ आहे. पण तिथे आपला प्रवास संपत नाही. माझी हिंदू धर्मावर श्रद्धा आहे म्हणून माझी पुनर्जन्मावरही श्रद्धा आहे. इतकं सुंदर तत्वज्ञान जगाच्या पाठीवर कुठेच नाही. आपण कपडे बदलतो तसं आपण शरीर बदलतो. इतक्या सध्या सोप्या शब्दात हे तत्वज्ञान लिहून ठेवलंय. हिंदुस्थान एक गूढ

देश आहे. जग कोणत्या अवस्थेत होत माहीत नाही पण अनादी काळापासून भारतात एक संस्कृती नांदतेय एवढं मात्र खरं... जन्म आणि मृत्यू विषयी इतके सखोल विचार हिंदूइतके कुणीच मांडले नाहीत. सावरकर सुद्धा हे तत्वज्ञान अनादी मी अनंत मी म्हणत सहज समजवून सांगतात... आपण जन्म घेतला तर आपल्याला जावंच लागणार. पण जाताना आपण दुसर्यांना प्रेरणा देऊन गेलो की आपल्या जीवनाचं सार्थक झालं समजा. मरावे परि किर्तीरूपे उरावे...

तुम्ही सगळे मित्र माझ्या मागे खंबीरपणे उभे राहिलात म्हणून मी स्वतःला सावरू शकलो. तुमच्याशिवाय मी शून्य आहे. लेखकाला वाचक नसतील तर त्याच्या लिखाणाचा काय फायदा? माझा अस्तित्व तुमच्यामुळे आहे... तुमच्या प्रेमामुळेच मी स्वतःला खंबीर करू शकलो. आणि म्हणूनच तुम्हा वाचकांची सेवा करता यावी म्हणून या प्रसंगातही लेखणीला आराम देत नाही. कर्तव्य महत्वाचं...

आज सावरकरांनी जगाला हेवा वाटेल असा पराक्रम केला होता. ब्रिटिशांच्या बंदुकीची गोळी त्यांना शिवू शकली नाही, दोन जन्मठेपेची शिक्षा जाहीर होऊनही दीर्घायुषी झालेला असा हा मृत्युंजय... सावरकर स्मारकातर्फे दोन दिवसांपूर्वी मला आजच्या दिवशी व्याख्यान देण्याविषयी चर्चा झाली. पण मी इथे अडकलो असल्यामुळे सावरकरांच्या विचारांची सेवा करता आली नाही याचे दुःख होत आहे. दुसरी गोष्ट आज आंबेडकरांच्या राजगृहावर हल्ला झाला. खूप वाईट

वाटलं. हल्लेखोराने आंबेडकर एकदा वाचून काढले पाहिजे, त्याच्या जीवनाच सार्थक होईल.

मी स्वतः हे सगळं भोगतोय म्हणून तुम्हाला अनुभवाचा सल्ला देतो. अनेक मित्रांपेक्षा मी खूप लहान आहे. पण अनुभव हा खरा शिक्षक असतो. तुम्हाला कसलाही त्रास होत असेल तर लगेच डॉक्टराना संपर्क करा. स्वतःवर स्वतःच औषधोपचार करून प्रयोग करू नका. काळ कठीण आहे. घाबरवत नाही पण जागं करतोय. स्वतःची काळजी घ्या, कुटुंबाची, शेजारच्याची आणि शक्य असेल तर समाजाची सुद्धा काळजी घ्या. डॉ. नील वाघमारे आणि वैद्य परीक्षित शेवडे हे फेसबुकवर आहेत. अगदीच काळजी वाटली तर यांच्यापैकी कुणाचा तरी सल्ला जरूर घ्या. तुमचे फॅमिली डॉक्टर असतील तर त्यांना संपर्क करा. आपल्याला या परिस्थितीत एकमेकांवर टीका करण्यापेक्षा एकमेकांचा आधार व्हायचं आहे... बाकी जन्म आणि मृत्यू अटळ आहे... आत्मा अमर आहे...
नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।
पुनश्च तुम्हा सर्वांचे आभार... श्रीराम तुम्हा सर्वांचे भले करो, कल्याण करो, रक्षण करो... समर्थक आणि विरोधक, सगळ्यांसाठी, अगदी जगासाठी प्रार्थना करतोय. श्रद्धा असेल तर श्रीराम जय राम जय जय राम म्हणत चला...

दिनांक: ०८/०७/२०२०

मानवतेची (बिजनेस) लॉबी उभारूया...

सर्वप्रथम काल डायरी लिहू शकलो नाही याबद्दल क्षमस्व. थोडं कामात होतो आणि अनेक ओळखीचे व अनोळखी मित्र कॉल केत होते. आता आपण थेट विषयाला हात घालू. काही दिवसांपूर्वी मी राजेंद्र वैशंपायन यांची मुलाखत घेतली होती. राजेंद्र जी म्हणाले की मराठी उद्योजक असा काही प्रकारच नसतो. उद्योजक हा फक्त उद्योजक असतो. त्याची भाषा मराठी असू शकते. मी त्यांच्या मताशी पूर्णपणे सहमत आहे. मराठीचा मुद्दा राजकारणासाठी व राजकीय नेत्यांच्या फायद्यासाठी आहे. सर्वसामान्य मराठी माणसाला त्याचा उपयोग शून्य आहे. उद्योजकाला तर नाहीच नाही. मुळात आपण मराठी या शब्दाला न्यूनगंड या शब्दाचा समानार्थी शब्द बनवून टाकला आहे. हा भीतीचा व्यपार आहे. कोरोनाप्रमाणे... मराठी नवउद्योजकांचे काही ग्रुप निर्माण होतात आणि विरून जातात. हे लोक म्हणे फक्त मराठी माणसाशीच बिजनेस करतात. पण बिजनेस असा एका ग्रुपमध्ये बंदिस्त करता येत नाही. सातासमुद्र पार बिजनेस गेला पाहिजे. तिथे कोण मराठी भेटणार आहे. म्हणून हा भीतीचा व्यापार बंद करून आपण केवळ उद्योजक आहोत एवढंच लक्षात ठेवलं पाहिजे. बिल गेट्स, मार्क झुकरबर्ग, धीरूभाई अंबानी हे त्यांच्या भाषेपुरते मर्यादित राहिले असते तर ते यशस्वी होऊ शकले असते का? आज जग त्यांचं अनुकरण करतंय.

आता कोरोनाच्या संक्रमणामुळे अनेक बिजनेस ठप्प झाले आहेत.

लोकांना कामे नाहीत... लोक डिप्रेशनमध्ये जात आहेत. पण हे जागतिक संकट आहे, हे काय फक्त भारत किंवा महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. त्यामुळे खचून न जाता आपण एकमेकांसोबत उभं राहिलं पाहिजे. मराठी, गुजराती, बंगाली या सगळ्या थोतांड संकल्पनेत गुंतण्यापेक्षा आपण हिंदुस्थानी, त्याही पुढे जाऊन बोलायचं तर वसुधैव कुटुंबकम हेच ध्येय समोर ठेवलं पाहिजे. आपण माणूस म्हणून एकत्र येऊन माणसांच्या समूहातून काम केल्यास येणारं आव्हान आपण नक्कीच पेलू... एकजुटीचे बळ खूप असते हे आपण शालेय जीवनात शिकलोच आहोत.

एक गोष्ट सांगतो, शंतनू फारच हुशार मुलगा. लहानपणापासूनच तो खेळात, अभ्यासात आणि मस्ती करण्यात अग्रेसर होता. त्यांची टीमच होती. शंतनू, हर्षद, कपील, सागर, कौशल, अतुल. लहानपणापासून ते एकत्र. ते नावाला मित्र होते. पण वागायचे सख्ख्या भावांप्रमाणेच. एवढंच नाही तर त्यांनी मिळून एक व्यवसाय सुरु केला होता. सहा जणांच्या या चमूने सुरु केलेला लहानसा व्यवसाय पाहता पाहता फारच मोठा झाला. सर्वांचं लग्नही झालं. बायकाही अगदी नक्षत्रासारख्या मिळाल्या ह्यांना. हे सुद्धा दिसायला काही कमी नाही. चित्रपटातल्या हिरोलाही मागे टाकतील. पण त्यांच्यात शंतनू उजवा आहे असं म्हणायला हरकत नाही. देखणा, बुद्धीमान, उच्चशिक्षित, हुशार आणि आता तर श्रीमंतही झाला होता. पण अचानक काय बिनसलं त्याचं कोणालाही कळायला मार्ग नाही. तो त्याच्या मित्रांशी फारसा बोलत

नव्हता. कंपनीतून त्याने भागीदारी काढून घेण्याचा निर्णय घेतला. मित्रांच्या असंही कानी आलं होतं की तो स्वतःची नवीन कंपनी स्थापन करणार आहे. हे सगळं इतकं अचानक कसं झालं? शंतनूच्या बायकोला कपीलने फोन केला व भेटण्यासाठी वेळ मागितला.

त्याच्या बायकोलाही शंतनूचा हा निर्णय पटला नव्हता. ती कपीलला म्हणाली की शंतनूला अहंकार झाला आहे. त्याला असं वाटतं की कंपनीला जो नफा होत आहे तो त्याच्या कर्तृत्वामुळे आणि फायदा मात्र इतर पाच मित्रांना होतोय. कपीलला हे ऐकून धक्काच बसला. कपीलने ही हकीकत सर्व मित्रांना सांगितली. सर्वांनी निर्णय घेतला एकदा शंतनूला जावून भेटायचं. कपीलने गुपचुप शंतनूच्या बायकोला फोन करुन सांगितलं की ते सर्व आज रात्री घरी येणार आहेत. पण शंतनूला या बद्दल कळता कामा नये. नाहीतर तो उगाच काहीतरी बहाणा करून न भेटण्याचे कारण शोधायचा. ठरल्याप्रमाणे सगळे शंतनूच्या घरी आले. दरवाजा शंतनूच्या बायकोने उघडला. तिने शंतनूला मित्र आल्याचे सांगितले. त्याच्या चेहर्या.वरचा तर रंगच उडाला. थंडी फारच पडली होती. शंतनू स्वेटर घालून शेकोटी समोर बसला होता. सर्व मित्र त्याच्या बाजूला खुर्चीत बसले. पण बोलायला सुरुवात कोण व कशी करणार, हे कुणालाच उमगेना. शेवटी शंतनूच्या बायकोनेच कंपनीचं काम कसं सुरु आहे, थंडी फार बोचरी आहे असले उगाच काहीतरी विषय उकरुन काढले. शंतनूला मात्र कशातच रस नव्हता. अचानक कपील उठला आणि त्याने एका काठीने शेकोटीतला निखारा बाजूला केला. शांतनूला

कळेना हा असा काय वागतोय. तसा तो निखारा हळू हळू विझू लागला. कपीलने शंतनूच्या खांद्यावर हात ठेवला. शंतनूने एक कटाक्ष कपीलवर टाकला आणि उठून त्याला मिठी मारली. सर्वांनी शंतनूला मिठी मारली. सर्वांच्याच ओठावर हसू आणि डोळ्यात अश्रू होते. शंतनू सारखा निखारा विझणार होता. इतक्यात मित्रांनीच त्याला सावरलं.
आपण सगळेच निखारे आहोत. एकएकटं लढायला गेलो तर विझून जावू. म्हणून उद्योग किंवा नोकरी किंवा अजून काही प्रोफेशनल वर्क करताना आपण आपल्या ओळखीच्या चांगल्या लोकांना समोर ठेवूया. समजा माझ्या एका मित्राला आजारावर गुण येत नसेल तर आपण आपल्या ओळखीतल्या चांगल्या डॉक्टरचा संपर्क त्याला देऊ शकतो. अजून कुणाला कसली सर्व्हिस हवी असेल तर आपल्या ओळखीतल्या चांगल्या सर्व्हिस प्रोव्हायडरच नाव सुचवू शकतो. आता उदाहरणार्थ मी लेखक आहे, तर कुणाला कंटेंट, एडिटिंग, स्क्रिप्ट, गाणी, आर्टिकल्स वगैरे सर्व्हिस हवी असल्यास तुम्ही माझं नाव सुचवू शकता. मी तुमचं नाव सुचवू शकतो. पण काम करणारी व्यक्ती खात्रीलायक व मेहनती हवी ही महत्वाची अट आहे. आपण एकत्र येऊन पुढे एक बिजनेस मॉड्युल उभं करू शकतो. एक ऑफिस घेऊन टेबल स्पेस शेअर करू शकतो. आपल्या स्किलशी लिंक्ड असलेल्या लोकांना एकत्र करून बरंच काही करू शकतो.

मला माहिती आहे बोलणं खूप सोप्पय, अनेकांचे बीजनेस उध्वस्त झालेत, नोकरी करणारे लोकही घरात बसलेत. मी एका माणसाचं

उदाहरण सांगतो, माझे एक मित्र आहेत. आता नाव सांगत नाही. लवकरच मी त्यांची मुलाखत घेणार आहे तेव्हा उघड होईलच. ते अभिनेते आणि डबिंग आर्टिस्ट आहेत. त्यांनी भागीदारीमध्ये एक टी शॉप सुरू केलं. खूप छान प्रतिसाद मिळाला त्यांना, मग अजून एक ब्रँच ओपन केली. तीही मस्त चालत होती. पण कोरोना आला आणि सगळंच विस्कळीत झालं. बिजनेससाठी उभे केलेले सगळे पैसे गेले, दुकानांचं भाडं, कामगारांचा पगार त्यांना द्यावा लागतो. बिजनेस उभे करतानाचे 25 - 30 लाख तर बुडलेच, वर जवळ जवळ दरमहा 70000 ते 80000 त्यांचे फुकटचे जातात. तरी तो माणूस नेहमी हसत खेळत असतो. जे झालं ते झालं... आता नव्याने सुरुवात करू, रडत बसून काही होणार आहे का? बॉस, हाच ऍटीट्युड पाहिजे. आज ते त्यांचा डबिंगचा व्यवसाय करतच आहेत. या माझ्या मित्राकडून आपण शिकू शकतो ना...

नकारात्मक बोलणाऱ्या लोकांपासून दूर राहून अशा लाईव्ह सकारात्मक लोकांकडून ऊर्जा घेऊन काम केलं पाहिजे. मी स्वतः 3 महिने घरी बसून आहे. त्यात आमच्यावर संकटांच डोंगर कोसळलं. फॅमिली कोरोना पॉजिटिव्ह झाली. बाबा वारले... लेकीन बॉस, शो मस्ट गो ऑन... मी कलाकार आहे, नाटकवाला. माझ्या गुरूंनी मला शिकवलं होत की आपल्या घरी कितीही वाईट प्रसंग आला तरी शोच्या दिवशी हजर असलंच पाहिजे. आपला मृत्यूच आपल्यासाठी एक्सक्यूज आहे. पण मी माझ्या विद्यार्थ्यांना/कलाकारांना नेहमी सांगतो. मृत्यू जरी आला तरी

आपल्या आत्म्याने येऊन प्रयोग केला पाहिजे... शो मस्ट गो ऑन...

हा कोरोना आपलं काही उखाडू शकत नाही मित्रांनो... आपण एकमेकांसोबत उभे राहिलो तर आपण यातून लवकरच बाहेर पडू, सध्या आपण सर्वात चांगल कोणतं काम करू शकतो, आपलं पॅशन काय आहे? याचा विचार करूया. पॉजिटीव्ह व्हायब्रेशन ठेवूया... पुढे या विचारांना कृतीत बदलूया. कोरोना नंतरचा माणूस हा नवा माणूस असला पाहिजे... कम्युनिस्ट संकल्पनेतला नवा माणूस म्हणा, इस्लामी किंवा ख्रिस्ती तत्वज्ञानातला कायमत का दिन म्हणा, किंवा जागतिक पितृसंस्था हिंदू धर्मातील पुनर्जन्म म्हणा... आपण नवे असणार आहोत, कोरोनाने स्वच्छता शिकवली, आपण मनानेही स्वच्छ असणार आहोत.

बच्चन साहेबांचा एक डायलॉग आहे. "तुम मुझे वहां ढूढ रहे हो और मैं तुम्हारा यहां इंतजर कर रहा हू"... बच्चन साहेब कसे त्या व्हिलन लोकांना सामोरे गेले आणि त्यांची पिटाई केली... बस्स... अपनको येईच डायलॉग कोरोना और आज की परिस्थिती को सुनाना हैं... "तुम मुझे वहां ढूढ रहे हो और मैं तुम्हारा यहां इंतजर कर रहा हू".

दिनांक: १०/०७/२०२०

कोरावणाचा वध केला...

आज मी, आई आणि पत्नी कोरोनावर मात करून बाहेर पडलो. आता आम्ही quarantine सेंटरमध्ये आलो आहोत. अजून 7 दिवस इथे काढायचे आहेत आणि मग घरी जायला मोकळे... आम्ही मालाडच्या रामलीला मैदानात उपचार घेतले. तिथली परिस्थिती चांगली नव्हती. घरात बसून पोस्ट्स लिहिणार्यांना रस्त्यावर काय घडतं ते माहीत नसतं. त्यासाठी रस्त्यावरच उतरावं लागतं... मोठमोठे लोक जे स्वतःला पत्रकार किंवा लेखक म्हणवतात ते एसी रूममध्ये बसून लोकांना ज्ञान वाटत फिरतात. पण ज्यांना ते ज्ञान वाटत राहतात, त्यांच्यात मिसळावसं वाटत नाही. मी तिथली विदारक परिस्थिती कथन करायला हा लेख लिहीत नाहीये. लिहिण्याचा ओघात जे आलं ते मांडलं. रामलीला मैदानात 10 दिवस उपचार करतात. तुम्हाला जाणून आश्चर्य वाटेल की प्रत्येक सेंटरमध्ये उपचाराचे दिवस वेगवेगळे आहेत. ज्यांना सीमटम्स नाही अशांबद्दल बोलतोय. काही सेंटरमध्ये 5 ते 7 दिवस ठेवतात, काही सेंटरमध्ये 10 दिवस. रामलीला मैदानात 10 दिवस ठेवतात.. या मैदानात कॉलेजमध्ये असताना मी बऱ्याचदा क्रिकेट खेळलेलो आहे. जिथे ॲडमिट होतो तिथे नाटकाची रिहर्सल केलेली आहे. होय, हे ओपन थिएटर आहे...

योगायोग पाहा. उपचार घेत होतो रामलीला मैदानात, उपचाराचे दिवस 10... रामलीलेमध्ये दहाव्या दिवशी रावणाचा वध होतो... या अर्थाने

आम्ही कोरोनारुपी रावणाचा, कोरावणाचा वध केला आहे... इथले 7 दिवस पूर्ण झाले तर लवकरच घरी जाऊ. पण घरी जाताना एक मेंबर कमी झालेला असेल... माझे बाबा...

कोरोना विरूद्‌ध आम्ही तिघांनी खंबीरपणे लढा दिला..पण या चिनी व्हायरसने माझे पितृछत्र काढून घेतले. या व्हायरमुळे मी खूप काही शिकलो आहे. आयुष्यात आपण अनेक गोष्टी विसरतो... विसरणे हे देवाने दिलेले एक वरदानच आहे. आपण जर प्रत्येक गोष्ट लक्षात ठेवत असतो तर आपण ठार वेडे झालो असतो. पण काही विशेष गोष्टी आपल्या लक्षात राहतात. त्यात कोरोनाला मी कधीच विसरणार नाही. हिंदू धर्मात 7 या संख्येला खूप महत्व आहे. सप्तपदी... 7 पावले चालल्यावर वर आणि वधू एकरूप होतात... 7 जन्माचे नाते असे आपण म्हणतो. तसेच हे 7 दिवसांचे quarantine... हेही दिवस जातील...

आज 10 दिवसांनी मोकळा श्वास घेतला... गेली 10 दिवस बाहेरच जग पाहिलं नव्हतं. तिथे तर साधी खिडकीही नव्हती. एरव्ही बस आणि ट्रेनमध्ये हक्काची खिडकी मिळवण्यासाठी आपण किती भांडत असतो. नै? इथे तर जगाशी नातं तुटलं होतं. तरी मी सतत लिहीत असल्यामुळे सोशल मीडियावर अनेक नवीन मित्र, हितचिंतक आणि वाचक भेटले... जुन्या मित्रांचे खरे चेहरे कळले. आपल्या पोस्टवर आपल्याला सांत्वन करणारे मित्र दुसऱ्याच्या पोस्टवर आपल्या दुःखाची

चेष्टा करत होते, फिदीफिदी दात काढत होते. मी त्यांची कधीच फिकीर केली नाही. उलट या काळात नवीन मित्र भेटले, अनेक लोक माझ्या दुःखात ओळख नसतानाही सहभागी झाले. मी लिहीत असलेल्या कोरोना डायरीमुळे त्यांना बळ मिळाला असं कित्येकांनी मला सांगितलं. तेव्हा आपण आपल्या दुःखाचा बाऊ न करता लेखणी हातात धरली त्याचे सार्थक झाले.

मी हे 10 दिवस आराम नाही केला. मला अनेकांनी पूर्ण आराम करायला सांगीतिला. त्यापेक्षा मी थोडा आराम आणि बाकी काम... म्हणजे वाचन, लेखन आणि वाचकांशी संवाद साधला. अनेकांनी माझ्याकडे आपलं मन मोकळं केलं. कोरोना आणि लॉकडाऊनचा आपला अनुभव सांगितला. त्यामुळे कोरोना सेंटरमध्ये राहूनही मी नेहमीप्रमाणे लोकांमध्ये मिसळलो. खरंतर तर लोकांनीच माझ्याशी संपर्क साधला. हे श्रेय त्यांचे.

मी आजपासून जाहीर करतोय की जर तुम्हाला तुमचं मन मोकळं करायचं असेल किंवा कोरोना विषयी व त्याच्या विरुद्ध लढण्या विषयी जाणून घ्यायचं असेल तर माझ्याशी कधीही संपर्क साधू शकता. तुम्ही मला तुमचा भाऊ, मुलगा अथवा मित्र समजून माझ्याशी चर्चा करू शकता. मला जे जे माहिती आहे ते ते सगळं मी तुम्हाला सांगायला तयार आहे. कुणी जर कोरोना पॉजिटिव्ह असेल तर माझ्याशी बोला... मी तुम्हाला धीर देईन. कुणी घाबरलं असेल तर त्याला माझ्याशी संपर्क

करायला सांगा... मी त्याला समजावून सांगा... या संकटाच्या काळात दुःखातून जात असाल तर डोकं टेकवून रडायला माझा खांदा आहे हे विसरू नका. मी तुमच्यासाठी 24 तास उपलब्ध आहे, पण लॉकडाऊनचे सगळे नियम पाळून (जरी अनलॉक झालं असलं तरी... कारण प्रसंग बाका आहे)...

मित्रांनो चला, आपण सगळे मिळून कोरावणाचा वध करूया... घाबरू नका, माझ्याकडे माणुसकीची संजीवनी बुटी आहे...

११/०७/२०२०

डर के आगे जीत है...

आज हा लेख मी लॅपटॉपमधून टाईप करतोय. आधीचे सर्व लेख मोबाईलवरुन लिहिले होते. मित्र श्रीपाद जोशी यांनी माझा लॅपटॉप माझ्या मेहुण्याकडून आणून दिला. १० दिवसांनंतर लॅपटॉप पाहुन खूप बरं वाटलं. आता लेखणी म्हणजे पेन नाही तर लॅपटॉप आहे. माझी लेखणी मला परत मिळाली. श्रीपांद जोशींचे आभार. काल केलेल्या आवाहनामुळे मला काही लोकांचे फोन आणि मेसेज येत आहेत. कुणाच्या घरातली व्यक्ती कोरोना पॉजिटिव्ह झालीय, कुणी क्वारंटाईन झालंय, तर कुणाला काही झालेलं नाही तरी कोरोनाची अशीच भिती वाटतेय. कोरोनाने ज्याप्रमाणे मानवी शरीराचा ताबा घेतलाय त्याचप्रमाणे त्याने मानवी मनाचाही ताबा घेतलेला आहे. मन हे सर्व आजारांचे कारण आहे.

अमोल पालेकर यांचा मेरी बिवी की शादी नावाचा एक चित्रपट आहे. यात पालेकरांनी भगवंतची भूमिका साकारली आहे. भगवंत hypochondriac आहे. म्हणजे सतत भितीच्या वातावरणात जगणार माणूस. गाडी चालवली आणि ॲक्सिडेंट झाला तर? बिल्डिंगच कोसळली तर? जगबुडी झाली तर? कोणत्याही गोष्टीची भिती वाटू शकते. भगवंतला तो आजारी असल्याची भिती वाटते. तो सतत त्याच भावनेत जगत असतो. यात एक सीन आहे, जिथे तो एक पुस्तक वाचत असतो. "छाती में दर्द होता हैं धडकन बढती हैं." असं म्हणत छातीला हात

लावतो आणि त्याच्या हृदयाचे ठोके जोरात वाजू लागतात. "हाथ पांव सुन हो जाते है" मग हात सुन्न झाल्यासारखे वाटतात. "आंखो के सामने अंधेरा छा जाता है." मग चष्मा खाली करुन बघतो, तर डोळ्यांसमोर अंधार येतो. "कानो में तरह तरह की आवाजे आती हैं" असं म्हणत पुस्तक ठेवतो तेव्हा पुस्तक टेबलावर असलेल्या हलणार्याआ आणि हलल्यावर म्युजिक वाजणार्याप बाहुल्याला लागतं. तसा बाहुला हलू लागतं आणि म्युजिक वाजतं. तर त्याला वाटतं की खरोखर त्याच्या कानात आवाज ऐकू येत आहेत... नंतर त्याला वाटतं की तो मरणार आहे आणि मग तो आपल्या बायकोसाठी नवरा शोधायला लागतो. चित्रपट फार गंमतीशीर आहे. एक माणूस भितीपोटी काय काय करु शकतो? एक खूप सिरीयस विषय खूपच विनोदी पद्धतीने हाताळलेला आहे. कोरोनाने अनेक लोकांना hypochondriac करुन टाकलेलं आहे. माणुस सतत भितीच्या प्रभावाखाली वावरतोय. म्हणून सगळ्यात आधी आपल्या मनातील भिती काढून टाकली पाहिजे. ही महामारी नाही हेही लक्षात घेतलं पाहिजे. आपण घाबरण्यापेक्षा कोरोना योद्धांचा आदर्श घेतला पाहिजे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आवाहन केल्यानुसार काही अपवाद वगळता आपण कोरोना योद्ध्यांसाठी टाळ्या आणि थाळ्या वाजवल्या, आपल्या मनातील भिती नाहिशी व्हावी म्हणून आपलं दीप प्रज्वलन केलं... पण कदाचित नंतर मोदींनी कोणताच टास्क दिला नसल्यामुळे भितीचं साम्राज्य पसरलं असावं... गंमतीचा भाग सोडला तर मला खरोखर असं

वाटतं की सतत देशातल्या कुणीतरी बड्या व्यक्तीने आपल्याशी संवाद साधत राहिला पाहिजे आणि आपल्याला धीर देत राहिलं पाहिजे. जेणेकरुन आपलं मन कमकुवत होणार नाही. डॉक्टर औषधोपचार करत आहेत, वैद्यकीय कर्मचारी आपली सेवा करत आहेत आणि पोलिसी यंत्रणा आपल्यासाठी दिवस रात्र राबत आहे. हे आपण पाहतो. आपल्याला त्यांचं कौतुकही वाटतं. ते कसे निर्धास्तपणे कोरोनाशी लढतात. पण खरं नाही, त्यांनाही भिती वाटत असेल, कुणीतरी त्यांचीही घरी वाट पाहतं असतं. कोरोना योद्ध्यांविषयी मी उद्या लिहिणार आहे म्हणून या लेखात फार चर्चा करत नाही. मला म्हणायचं असं आहे की भिती कुणाला नही वाटत. भले भले पैलवान सुद्धा अंधारात जायला घाबरतात. माणसांशी दोन हात करतील हो, पण भूताशी कसा लढेल पैलवान. हेच भूत आपल्या मानगुटीवर बसलंय. कोरोनाच्या भितीचं भूत... आपण सामुहिकरित्या hypochondriac फेजमध्ये वावरतोय. म्हणून मी वर मोदींचं उदाहरण दिलं. लोकांनी या गोष्टींची खिल्ली उडवली. पण त्यांना सामान्य माणसाचं मन कळत नाही, त्यांची भावना कळत नाही. आपण फेसबुकवर अनेक पोस्टस पाहतो, ज्यात टिव्ही सिरीयलची खिल्ली उडवलेली असते. त्यांच्यामते टिव्ही मालिका रटाळ असतात. पण खिल्ली उडवण्यासाठी का होईना, ते मालिका बघतात. त्यांना असं वाटतं की ते खूप हुशार आहेत. निःसंशय ते हुशारच आहेत. रस, आस्वाद याविषयी त्यांना चांगलं ज्ञान आहे. पण सर्वसामान्य लोकांचं काय? या सर्व हुशार लोकांनी एकदा तरी प्रोडक्शन हाऊस किंवा चॅनलला भेट देऊन त्यांना जी पत्रे येतात, ती वाचली पाहिजे. मग

त्यांना सामान्य लोकांचं मन कळेल. मी कुणावरच टिका करत नाहीये. मी फक्त हकीकत सांगतोय. सत्य परिस्थिती सांगतोय. ती पत्रे वाचून तुम्हाला कळेल की लोक त्या मालिकांप्रति किती भावूक आहेत, त्या पात्रांमध्ये ते इतके गुंतून गेलेत की त्या पात्रांमध्ये ते स्वतःला पाहतात. एक मराठी मालिका होती, नाव सांगत नाही. त्यात एका सूनेवर खूप अत्याचार व्हायचे... तिच्या सारकडचे लोक डोक्यावरच आपटलेले होते. ते काही ना काही बहाणा काढून तिला त्रास द्यायचे. तर किती तरी बायकांनी चॅनलला पत्रे लिहिली आणि कळवलं की हिचं दुःख पाहिलं की आम्हाला आमचं दुःख लहान वाटतं. ही खरी परिस्थिती आहे. म्हणून मी सतत रस्त्यावर येऊन काम करा असं का म्हणतो? त्याचा शब्दशः अर्थ घेऊ नका. मला इतकंच म्हणायचंय की तुम्हाला सामान्य लोकांच्या भावना कळल्या पाहिजे, त्यांचं दुःख तुम्हाला समजलं पाहिजे. म्हणूनच आता देशाभरातल्या लोकांना धीर देण्याची गरज आहे.

लोक खूप घाबरलेले आहेत. त्यांना कुणीतरी आईच्या मायेने समजवलं पाहिजे. मला असं वाटतं की हुशार आणि बुद्धिमान मंडळींनी पुढाकार घेतला पाहिजे. पण लोकांशी संवाद साधताना आपला बुद्धिवाद बाजूला ठेवून भावनिक संवाद साधला पाहिजे. बुद्धिवाद बाजूला ठेवा याचा अर्थ डोकं बाजूला ठेवा असं नव्हे. पण अनेक बुद्धिवादी तर्कट असतात, तर्कसुसंगत नसतात... त्या तर्कटपणाचा सामान्य लोकांना काय उपयोग? तर या बुद्धिवादी लोकांनी लेखक, व्हिडिओ बनवून सकारात्मकतेची एक चेन निर्माण केली पाहिजे. नेटवर्क मार्केटिंग कसं

असतं... तसं आनंदाचं मार्केटिंग केलं पाहिजे. आपल्याला आता आनंद विकण्याची गरज आहे. बावर्चीमधला राजेश खन्ना बनण्याची वेळ आलेली आहे मित्रांनो.

भित्यापोटी ब्रह्मराक्षस असतो असं म्हणतात ते उगाच नव्हे. हा ब्रह्मराक्षस कोरोनाच्या रुपाने आपल्या समोर उभा आहे. ही भिती घालवायची असेल तर स्वयंसूचना करणे खूप गरजेचे आहे. आपण रामा्च्या चरित्राचा अभ्यास केला पाहिजे. राम हा राजा आहे, भावंडांमध्ये सगळ्यात मोठा आहे तरी त्याला वनवास भोगावा लागला, त्याच्या पत्नीचं अपहरण झालं, रावणाला मारुन परत आल्यानंतर त्याला पत्नीपासून दूर राहावं लागलं... इतकं सगळं होऊन सुद्धा राम हा रामच राहतो. तो जरा सुद्धा ढळत नाही. स्थितप्रज्ञ आपण म्हणतो, ते हेच... आपल्यासारख्या सामान्य माणसाला हे सहज शक्य होईल असं मी मुळीच म्हणत नाही. पण भिती निर्माण करणार्याय सगळ्या गोष्टीपासून आपण दूर राहिलं पाहिजे. एपिबी माझची ऍंकर आणि तरुणांच्या दिलाची धडकन, ज्ञानदा कदम कोरोनाशी लढून आली तेव्हा पसन्न जोशी यांनी तिची मुलाखत घेतली. त्या मुलाखतीचे मीम्स खूप व्हायरल झाले. त्यात प्रसन्न तिला विचारतो की तू कोरानाशी लढण्यासाठी काय काय केलं. तर ज्ञानदा म्हणते मी सगळ्यात आधी एबिपी माझा बघण बंद केलं... खरं सांगू का? आपल्यालाही हेच केलं पाहिजे. एखाद्या चॅनलविषयी मी बोलत नाही, कुणाचीही बदनामी सुद्धा करत नाही. पण नकारात्मक बातम्यांपासून दूर राहिलं पाहिजे. बातम्यांमध्ये जगाची माहिती सांगताना किती कोरोनाग्रस्त झाले आणि

किती जण कोरोनामुळे मेले हेच आपल्याला सांगितलं जातं. म्हणून आपण भितीला पूर्णपणे शरण जातो. मोटिव्हेशनल वाचा असं मी म्हणणार नाही. सांग सांग भोलानाथ या काव्याबद्दल एकदा मंगेश पाडगावकरांना विचारलं असताना ते म्हणाले की सतत मुलांना संस्कारांचे डोस पाजू नये, त्यांना आनंद मिळावा असं काहीतरी केलं पाहिजे. सांग सांग भोलानाथ ही कविता ऐकताना, वाचताना आणि म्हणताना मुलांना आनंद मिळतो. म्हणून तुम्हाला ज्यात आनंद मिळेल ते करा, वाचा किंव पाहा. अंधकारावर प्रकाश मात करु शकतो, भितीवर आनंद मात करु शकतो. तसंच वर सांगितल्याप्रमाणे स्वयंसूचना देत रहा, स्वतःशी बोलत रहा... "मी निरोगी आहेस... माझी इम्युनिटी पॉवर स्ट्रॉंग आहे. जगातला कोणताही आजार, कोणताही व्हायरस माझ्या शरीराला नुकसान करु शकत नाहीस." आपल्या शरीराच्या प्रत्येक भागाला धन्यवाद म्हणा... ते सगळे भाग व्यवस्थित काम करतायत म्हणून तुम्ही जीवंत आहात. प्रत्येक गोष्टीसाठी कृतज्ञता व्यक्त करा... जरी शिंक आली आणि लगेच तुम्ही र्माल नाकासमोर धरला तरी... तुम्ही कोणत्याही गोष्टीसाठी आभार मानू शकता... बहिणाबाई म्हणतात,

"मन जहयरी जहयरी
याचं न्यारं रे तंतर,
आरे इचू, साप बरा
त्याले उतारे मंतर !"

मित्रांनो, म्हणून सांगतो... आनंदी रहा... भितीपासून चार हात दूर रहा... माऊंटन ड्युची एक जाहिरात आहे. ज्यामध्ये एक सैनिक पाण्यात उडी मारायला घाबरतो. तेव्हा त्याला त्याच्या आतला आवाज ऐकू येतो, "डर सुनने में तो छोटा-सा लगता, पर जब लगता है, तो बहुत लगता है, डर सबको लगता है, गला सबका सूखता (कोरोनामुळे, गला सबका खिचखिचाता है) है और रास्ते सिर्फ दो ही होते हैं, भिड़ो या भागो। आज भागे तो हमेशा भागते रहोगे और भिड़े तो जीतोगे क्योंकि 'डर के आगे जीत है"।

१२/०७/२०२०

कोरोना योद्ध्यांना मानाचा मुजरा...

मूळ विषयाला सुरुवात करण्यापूर्वी एक अत्यंत महत्वाची गोष्ट सांगू इच्छितो जी कोरोना विरुद्ध लढण्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. ती म्हणजे, कृपया कोरोनाविषयीच्या बातम्या पाहणे आणि वाचणे पूर्णपणे बंद करा. आज काही नवीन वाचकांशी फोनवर बोलणं झालं त्यामुळे प्रकर्शाने जाणवलेली गोष्ट म्हणजे लोक बातम्या पाहतात, वाचतात म्हणून भयभीत झालेत. तर माझी हात जोडून तुम्हाला विनंती आहे या बातम्यांपासून दूर रहा. बातम्या पाहून आपण काही समाजात बदल घडून आणणार आहोत का? तसे असेल तर पाहा आणि कामाला लागा... पण आपण सर्वसामान्य लोक आहोत, आज कोरोनाच्या काळात देशभक्तीची व्याख्या बदलली आहे, शक्यतो बाहेर न पडणे, मास्क लावणे आणि कोरोनासंबंधित सगळे नियम पाळणे म्हणजे देशभक्ती, जो हे नियम पाळत नाही तो देशद्रोही आहे असे समजा. मी खूप कठोरपणे बोलतोय. पण हे सत्य आहे मित्रांनो... तुम्ही घरी सुरक्षित आहात म्हणजे तुम्ही देशभक्त आहात. पण घरी राहुन आपण समाज बदलू शकत नाही म्हणूनच या बातम्यांपासून शक्यतो नव्हे तर जाणीवपूर्वक दूर रहा. हे बातमी देणारे भितीचा सौदा करत आहेत. तुम्ही माझं ऐकाल अशी माझी श्रद्धा आहे.

आज आपण कोरोना योद्ध्यांविषयी बोलणार आहोत. तीन दिवसांपूर्वी साई गडेकर नावाच्या माझ्या मित्राशी बोलणं झालं. तो डाइलिसिस

टेक्निशियन आहे. माझ्या वडीलांची बातमी ऐकून माझं सांत्वन करायला त्याने फोन केला होता. त्याच्याशी बोललो तेव्हा कळलं की तो मार्चपासून घरी गेलेला नाही. डाइलिसिस टेक्निशियन असला तरी तिथे येणारे रुग्ण कोरोना पॉजिटिव्ह निघाले तर त्याच्यामुळे त्याच्या म्हातार्या् आई वडीलांना धोका निर्माण होऊ शकतो म्हणून तो घरी जायचं टाळतो. या अर्थाने तोही कोरोना योद्धा आहे. माझ्या सासर्यां्चे पोलिस मित्र आहेत. ते क्राईम विभागात काम करतात. त्यांचं खरं नाव गोविंद सावंत आहे. पण सगळे त्यांना बाळा म्हणून हाक मारतात. कोरोना आल्यापासून ते सुद्धा घरी गेलेले नाहीत. कधी घरच्यांची आठवण आली तर घराच्या बाहेर जरा दूर उभं राहुन त्यांना पाहतात, रेशनचं सामान वगैरे द्यायला घरा जवळ जातात आणि हे सगळे पोलिस मित्र एका खोलीत राहतात व स्वतःच स्वयंपाक करुन जेवतात. ते कोरोना योद्धे आहेत.

कोरोना संक्रमण आल्यानंतर वैद्यकीय कर्मचारी आणि पोलिसी यंत्रणा ज्या झपाटलेपणाने काम करतेय ते पाहुन मन धक्क होतं. एरव्ही लोक पोलिसांना मामू, पांडू म्हणतात. पण ते पांडू नसून माणसातले पांडुरंग आहेत. लोक पंढरपुरच्या पांडुरंगाला साकडे घालतात आणि या खाकी वर्दीतल्या पांडुरंगाकडे आशेने पाहतात. मी धुळे दंगल सत्यशोधन समितीतर्फे निवृत्त पोलिस अधिकारी वाय. सी. पवार यांच्यासोबत काम केलं आहे. पोलिसांना आपण जितके निष्ठूर समजतो तसे ते मुळीच नसतात. प्रत्येक क्षेत्रात काही अपवाद असतातच. पण माझ्ा

पोलिसांविषयीचा अनुभव खूप चांगला आहे. त्यांना माणसांची पारख असते. कोणताही सण असला की आपण आपल्या कुटुंबासोबत आनंद साजरा करत असतो. पण कित्येक पोलिस मात्र ड्युटीवर असतात. पोलिस नसतील तर देशात अनागोंदी माजेल, दंगली होतील. हे विधान मी पूर्णपणे शुद्धीत करतोय.

डॉक्टरांच्या बाबतीत म्हटलं तर माझे मित्र परीक्षित शेवडे, नील वाघमारे, आमचे फॅमिली डॉक्टर सहस्त्रबुद्धे किंवा डॉ. स्वामी... माझे मित्र विलास म्हेतर यांची पत्नी ट्रॉमामध्ये नर्स आहे, मित्र प्रशांत माटलची पत्नी पूर्वा माटल नर्स आहे, माझ्या बायकोच्या मामे भावाची बायको सोनाली घुमरे नर्स आहे, मित्र अमेय गोखले स्वेच्छेने कोरोना योद्धा झाले होते. ही माझ्या ओळखीतली नावे आहेत. माझ्या ओळखीत असे किती तरी कोरोना योद्धे आहेत. त्या सर्वांची नावे लिहायला गेलो तर कोरोना योद्धे सहस्त्र नामावली लिहावी लागेल. त्यांच्या नावाचा उल्लेख करु शकत नसल्याने त्यांनी मला माफ करावे. आज धारावी कोरोना मुक्त होण्याच्या मार्गावर आहे. यामध्ये बीएमसी सोबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांचा सिंहाचा वाटा आहे. हे केवळ धारावीचं उदाहरण. संघ स्वयंसेवक सगळीकडे असेच काम करत आहेत. माझ्या ओळखीतलेच स्वयंसेवक हाताच्या बोटावर मोजता न येण्याइतके आहेत. तरी सुद्धा काही लोक त्यांचे श्रेय हिसकावून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. हा दांभिकपणा त्यांच्यात येतो कुठून? बाबा आमटे, विकास आमटे, प्रकाश आमटे यांनी केलेले कार्य सुद्धा

काही लबाड लोक नाकारतात. कारण हे लोक कार्य नंतर पाहतात, किंबहुना पाहतच नाही. पण त्यांना कार्य करणार्यां ची जात मात्र दिसते. हे कोरोना योद्धे आपल्या जीवावर उदार होऊन आपली सेवा करत आहेत. आपण या बदल्यात त्यांना काही देऊ शकत नाही. परंतु त्यांचे श्रेय तरी त्यांना द्यायला हवे. ते करत असलेल्या कामासाठी त्यांची पाठ थोपटवायला हवी. सामाजिक कार्यकर्त्यांची नेहमीच अवहेलना होत राहते. आंबेडकर, सावरकर, शाहू महाराज यांना किती त्रास झाला असेल याची जाणीव आजच्या परिस्थितीवरुन आपल्याला होते. तरी सुद्धा लोक जनतेसाठी झटतात... कारण इथल्या मातीला वरदान प्राप्त झाले आहे. पाश्चात्य लोक भारताला चिडवताना म्हणायचे की तुमच्याकडे किती विक्रमादित्य आहेत? कोण कोणता विक्रमादित्य हेच कळत नाही, किती गोंधळ उडतो. त्यांना उत्तर देताना सावरकर म्हणायचे, गोंधळ उडायला आमच्या मातृभूमीत इतके विक्रमादित्य जन्माला आले आहेत. तुमच्याकडे एक नेपोलियन आणि एक अलेक्झांडर... सांगायचं तात्पर्य भारताला देवभूमी, महापुरुषांची आणि साधू संतांची भूमी म्हणतात ते उगाच नव्हे. संघ परिवार, बाबा आमटे परिवार हे आधुनिक ऋषी आहेत असे माझे प्रांजळ मत आहे. विकास आमटे यांच्या आनंदवनने सुद्धा या काळात अनेक गरजुंना अन्यधान्याची मदत केली आहे, हे इथे मी नमूद करु इच्छितो...

पोलिस, डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी या काळात आपल्यासाठी जे काही केलं आहे, ते आपण कधीच विसरु नये.

भारताच्या सीमा सैनिकांमुळे सुरक्षित आहेत आणि भारत या योद्ध्यांमुळे सुरक्षित आहे याची जाणीव आपण सदैव ठेवली पाहिजे. मी कोरोनासाठी सरकारी उपचार घेतले म्हणून कोरोना योद्ध्यांशी माझा थेट संबंध आला. आता मी जिथे क्वारंटाईन आहे, तिथे जे कर्मचारी काम करतायत त्यांच्याकडे पीपीई कीट नाही. त्यांना स्वतःला स्वच्छतेचं भान नाही. गलिच्छ अवतार घेऊन वावरतात. अशा परिस्थितीत आमच्यामुळे त्यांना किंवा त्यांच्यामुळे आम्हाला पुन्हा कोरोनाचा संसर्ग होऊ शकतो. सरकारने याकडे लक्ष दिलं पाहिजे. अजून एक मुद्दा मी सरकारच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की कोरोना वॉर्ड आणि क्वारंटाईन सेंटरमध्ये जे जेवण येतं, त्याचं प्रमाण खूप असतं. म्हणून अनेक लोक जेवण टाकून देतात. जर माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले तर जेवणात भाताचे प्रमाण कमी करता येऊ शकेल. जेणेकरुन अन्न वाया जाणार नाही. या आर्थिक अडचणीच्या काळात अन्न वाया घालवणे हे महापाप आहे. कृपया आपल्या ओळखीत सरकारी यंत्रणेतील कुणी असतील तर त्यांना हा मुद्दा अवश्य कळवा. लिहिण्याच्या ओघात हा मुद्दा मला अत्यंत महत्वाचा वाटला म्हणून इथे मांडला. अन्न हे पूर्णब्रह्म मानणारी आपली संस्कृती आहे. भारतात आजही कितीतरी लोक उपाशी झोपतात आणि आपण उगाच जेवण वाया घालवतोय. त्यापेक्षा गरजुंना हे जेवण मिळालं तर केवढी तरी मोठी क्रांती घडेल.

माझी तुम्हा सर्वांना विनंती आहे की ईश्वरापुढे उभं राहुन या कोरोना

योद्ध्यांसाठी अवश्य प्रार्थना करा... सावरकरांना विचारलं की स्वातंत्र्य कोणामुळे मिळालं तर सावरकर म्हणाले की सशस्त्र क्रांतीकार्यां मुळे, अहिंसावादी क्रांतीकार्यां मुळे, इतकेच नव्हे तर ज्यांनी स्वातंत्र्य प्राप्तीकरिता देवापुढे एक फुल जरी अर्पण केलं असेल तर त्यांच्यामुळे सुद्धा स्वातंत्र्य मिळालं आहे. त्यामुळे ईश्वरासमोर उभं राहुन कोरोना योद्ध्यांसाठी प्रार्थना करण्याला खूप महत्व आहे. कुणी नास्तिक असेल तर ते या योद्ध्यांचे आभार तर मानू शकतात आणि त्यांच्या आरोग्यासाठी व दीर्घायुष्यासाठी मनोकामना करुच शकतात... मित्रांनो, या कोरोना योद्ध्यांमुळे आपण सुरक्षित आहोत... त्यांच्यासाठी आपण इतके तर करुच शकतो... कोरोना योद्ध्यांना मानाच मुजरा...

१३/०७/२०२०

कोरोना रुग्णांचा दिनक्रम...

अनेकांनी मला कोरोना रुग्णांचा दिनक्रम लिहायला सांगितला आहे. कोरोनावर औषध निघालं नसताना कोरोना बरा कसा होतो हे कोडंही लोकांना सतावत आहे. सध्या प्रायव्हेट हॉस्पिटल रुग्णांना अक्षरशः लुटत आहेत. कोरोनावर असे कोणतेच विशेष औषध नसताना लाखोंचे बिल त्यांच्या नातेवाईकांच्या हातात देत आहेत. सरकारी ट्रिटमेंट पूर्णपणे मोफत आहे. पण प्रशासनावर ताण वाढत असल्यामुळे आणि बर्यापचदा बेड उपलब्ध न झाल्यामुळे नाइलाजाने प्रायव्हेट हॉस्पिटलच्या खजान्यात भर घालावी लागत आहे. या काळात हॉस्पिटलने उलट पैसे कमी करायला हवेत. सरकारी यंत्रणेवरचा त्राण वाढला तर प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये रुग्णांची संख्या वाढू शकते. म्हणून सरकारने कोरोनावर उपचार करणार्यार हॉस्पिटल्सने किती पैसे आकारावेत याचे नियम आखुन दिले पाहिजे.

तर मी आता कोरोना रुग्णांचा दिनक्रम सांगणार आहे. बाबा पॉजिटिव्ह आल्यानंतर मी माझ्या पूर्ण कुटुंबाला क्वारंटाईन करून घेतले. एका एसआरएच्या बिल्डिंगमध्ये आम्हाला ठेवण्यात आलं. तिथे सोयी चांगल्या होत्या, फक्त पाणी येत नव्हतं. म्हणजे संध्याकाळी थोडाच वेळ पाणी यायचं. त्या वेळेत प्यायचं पाणी भरुन घ्यायचं आणि आंघोळ व कपडे धुणे सगळं आटोपून घ्यायचं. कारण पाणी गेलं तर पुन्हा दुसर्याु दिवशी येणार. तिथे आमच्यावर औषधोपचार केले जात

नव्हते. पण काही त्रास झाला तर डॉक्टर उपलब्ध असायचे. तिथे दोन दिवसांनंतर आमची टेस्ट झाली. मी, पत्नी, आई आणि मुलगा... दोन दिवसांनी आमचे रिपोर्ट आले... मुलगा सोडून आम्ही तिघे पॉजिटिव्ह आलो. त्यानंतर आम्ही लगेच मुलाला मेहुण्याकडे पाठवले आणि आम्हाला रामलीला मैदानात घेऊन गेले. हे कोविड सेंटर सगळ्यात वाईट होतं. इथे सामान्य सुविधा सुद्धा मिळत नव्हत्या. इथे मोबाईल संडास होतं. ज्यामुळे लघवी किंवा पाणी वरच साचून राहायचे. संडास अगदी घाणेरडं होतं आणि आंघोळीची सोय सुद्धा वाईट होती. वॉश बेसिन काळवंडलेलं होतं. मी जिथे ऍडमिट होतो, तिथे साधारण १०० बेड्स होते आणि दोन बेड्समध्ये फारसा अंतर नव्हता. सुदैवाने तिथे रुग्ण कमी असल्यामुळे आम्ही एकेक बेड सोडून झोपायचो. संपूर्ण फ्लोअरवर कचरा पडलेला होता. झाडू मारायलाही कर्मचारी घाबरत होते.

दोन माळ्याची बिल्डिंग आणि आम्हाला तिसर्याम मजल्यावर म्हणजे गच्चीवर ठेवलं होतं. तिथे तंबू बांधण्यात आला होता. वर प्लास्टिक टाकल्यामुळे कॉर्नरला पावसाचं पाणी यायचं. या सेंटरच्या खूप तक्रारी बीएमसीला गेलेल्या होत्या हे विशेष. पुरुष फारसे तक्रार करायचे नाहीत पण महिला तक्रार करायच्या. इथली अस्वच्छता पाहुन भीती वाटायची की कोरोना एकवेळ बरा होईल, पण जाताना दुसरा एखादा रोग घरी घेऊन नको जायला. संस्कार कॉलेजच्या क्वारंटाईन सेंटरचा एक माणूस माझ्यासोबत ऍडमिट होता, त्याने सांगितलं की त्यांच्या जेवणात कीडे मिळायचे. आम्हाला मिळणारं जेवण बेचव होतं पण किमान आमलेलं

किंवा किड्यांची फोडणी दिलेलं नव्हतं याचं समाधान वाटतं. शालेय शिक्षिका आणि लेखिका निवेदिता सावंत यांनी मागे एक पोस्ट टाकली होती की त्यांची बहिण जिथे कोरोनाचे उपचार घेत होती, तिथे तिच्या जेवणात कीडे सापडले होते. मला लगेच सावरकरांचे माझी जन्मठेप हे पुस्तक आठवले. त्यांना कशाप्रकारची वागणुक मिळत होती अंदमानमध्ये याचे विदारक चित्र समोर उभे राहिले. त्यामानाने आपण नशीबवानच म्हणायचो.

कोरोना वॉर्डमध्ये आल्यावर रुग्णांना कोणती औषधे दिली जातात? याबद्दल लोकांना खूप उत्सुकता आहे. पण तुम्हाला वाचून आश्चर्य वाटेल की सर्दी, खोकला, ताप, मल्टिव्हिटामिन, झिंक आणि व्हिटामिन सी सोडून कोणतीच औषधे दिली जात नाही. आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की मग प्रायव्हेट हॉस्पिटल इतके पैसे का घेतात? हा प्रश्न सगळ्यांनाच पडलेला आहे आणि याचे उत्तर कुणाकडेच नाही. कोरोना सेंटरमध्ये सकाळी नाश्ता आणि चहा येतो, त्यावेळी रुग्णांची ऑक्सिजन लेव्हल आणि तापमान तपासले जाते. तेव्हा काही गोळ्या दिल्या जातात. त्यानंतर दुपारी जेवण येतं. तेव्हा जेवणासोबत दोन गोळ्या दिल्या जातात. संध्याकाळी चहा येतो आणि रात्री जेवण मिळतं. जेवणासोबत पुन्हा सकाळी ज्या गोळ्या दिल्या त्याच गोळ्या दिल्या जातात आणि तापमान व ऑक्सिजन लेव्हल तपासली जाते. खोकला असेल तर कफ सिरफ दिलं जातं. डिहायड्रेशन होत असेल तर ओआरएस दिलं जातं. पोट खराब असेल गॅसची गोळी देतात. यापलीकडे

माझ्यावर तरी उपचार केलेले नाहीत. श्वास घ्यायला त्रास होत असेल तर ऑक्सिजन लावलं जातं. हे कोरोना रुग्णांवर केले जाणारे उपचार आहेत. आता याने कोरोना बरा कसा होतो याचं उत्तर डॉक्टरच देऊ शकतात. पण मी जितकं ऐकलं आहे त्यावरून तुमची रोगप्रतिकारशक्ती हाच महत्वाचा घटक आहे. दुसरा अत्यंत महत्वाचा घटक, जो केवळ कोरोनाच नव्हे सगळ्या रोगांवर लागू होतो, इतकंच काय जीवनाच्या प्रत्येक प्रसंगाला लागू होतो.... आपले मनोधैर्य... "मन सुद्ध तुझं गोस्त हाये पृथिविमोलाची तू चाल पुढं तुला रं गड्या भीति कशाची पर्वा बी कुनाची" हा महत्वाचा फॅक्टर आहे कोरोनाशी लढण्याचा...

इतर वेळी मी मोबाईलवर चित्रपट बघणे, वाचन करणे आणि रात्री लेख लिहिणे व दिवसभर लेखाचा विषय आणि मुद्द्यांचा विचार करणे त्याचबरोबर वाचकांशी संवाद साधणे यामध्ये माझा दिवस जात होता. आता इथे ७ दिवसाच्या क्वारंटाईन सेंटमध्येही औषधे सोडली तर माझा दिवस असाच जातो... मित्रांनो कोरोना रुग्णांचा दिनक्रम एवढाच आहे. यापलीकडे इथे करण्यासारखे काही नाही. तरी तुम्ही आणि मी एकमेकांशी कनेक्टेड आहोत. आधुनिक युगाच्या तंत्रज्ञानामुळे हे सगळं शक्य होतंय. आपण आधुनिक जगात वावरत नसतो तर इथले दिवस खूप कंटाळवाणे गेले असते. मी काही वाचकांशी बोललो होतो, माझ्या लेखांवरच्या काही कमेंट्स पाहिल्या होत्या. त्यांनी तिथली सुविधा, जेवण, औषधे याचे तपशील द्यायला सांगितले म्हणून हा लेख खास तुमच्या आग्रहावरुन लिहिला आहे. मला जे घरबसल्या उपचार सांगितले

होते, ते उपचार तुम्ही सुद्‌धा करु शकता. गरम पाणी पिणे, हळद आणि मिठाच्या गुळण्या करणे, गरम पाण्यात लसूण ठेचून त्याची वाफ घेणे. एका भांड्यात एकानेच वाफ घ्यायची. हळदीचं दूध किंवा पाणी पिऊ शकता. त्यापलीकडे जर काही जाणून घ्यायचे असेल तर डॉक्टरांचाच सल्ला घ्या. डॉक्टरांऐवजी शक्यतो कुणाचे ऐकू नका. डबल ब्रिदिंग सारखे उपाय करु शकता. याचा व्हिडिओ युट्युबवर सहज उपलब्ध आहे. समीर देखणे यांनी आमच्यावर प्राणिक हिलिंग केले. त्याचा फायदा मला झाला. तुमचा विश्वास असेल तर तुम्ही सुद्‌धा प्राणिक हिलिंग करुन घेऊ शकता.

मनाला वळण देण्यासाठी कै. भीष्मराज बाम यांनी उत्तम उपाय सांगितलाय, उत्तमाची रोजनिशी... एक डायरी घ्यायची, तिचे तीन भाग करायचे. पहिला भाग भूतकाळ, दुसरा भाग वर्तमानकाळ आणि तिसरा भाग भविष्यकाळ. रोज ही डायरी लिहायची. भूतकाळात घडलेली एक चांगली घटना भूतकाळाच्या भागात लिहा... आज घडलेली चांगली, सकारात्मक घटना वर्तमानकाळाच्या भागात लिहा आणि भविष्यात काय चांगले घडावे असे तुम्हाला वाटते ते भविष्यकाळाच्या भागात लिहा. चांगले म्हणजे अगदी तुम्ही रिक्षाची वाट पाहताय आणि लगेच तुम्हाला रिक्षा मिळाली ते भारताने पाकवर सर्जिकल स्ट्राईक केले अशी कोणतीही घटना असू शकते. यामुळे तुम्ही सतत सकारात्मक व्हायब्रेशनमध्ये जगत राहता. सगाळी उठल्यावर तुम्हाला नवे जीवन मिळाल्याबद्‌दल आभार माना आणि "दर दिवशी दरेक बाबतीत मी

अधिकाधिक संपन्न आणि चांगला होत आहे" अशी सूचना मनाला द्या. हा उपाय द.पां. खांबेटे यांनी सांगितलेला आहे. द.पां. खांबेटे हे मार्मिकचे उपसंपादक होते. "वाचा आणि शांत बसा" हे मार्मिकचे बाळासाहेबांचे वाक्य गाजले होते. त्याची मूळ संकल्पना द. पां. खांबेटे यांची आहे. जुन्या लोकांना हे माहितीच असेल. तर रात्री झोपताना या निरोगी जीवनाबद्दल आणि तुम्हाला या सोयी सुविधा मिळत आहेत त्याबद्दल आभार माना... बस्स. एवढं पुरेसं आहे. कोरोनावर तुम्ही नक्की मात कराल. तुम्हाला कोरोना रुग्णांचे दिनक्रम जाणून घ्यायचे होते म्हणून मी ते लिहिले आहे. पण तुमच्याकडून हे दिनक्रम जाणून घेण्याची वेळ कधीच येऊ नये अशी मी प्रार्थना करतो... आपले मन म्हणजे हनुमंताचे विशाल रुप आहे आणि आपल्या मनाच्या शक्ती समोर कोरोना म्हणजे केवळ एक मुंगी आहे... बाकी तुम्ही सुज्ञ आहातच...

शांताराम बापूंनी लिहिलेले हे गीत आपल्या मनावर कोरुन ठेवा...

मन सुद्ध तुझं गोस्त हाये पृथिविमोलाची
तू चाल पुढं तुला रं गड्या भीति कशाची
पर्वा बी कुनाची

झेंडा भल्या कामाचा जो घेउनि निघाला
काटंकुटं वाटंमंदी बोचति त्येला

रगत निगंल, तरि बि हंसल, शाबास त्येची

जो वळखितसे औक्ष म्हंजी मोटि लडाई
अन्हत्याराचं फुलावानी घाव बि खाई
गळ्यामंदी पडंल त्येच्या माळ इजयाची

१४/०७/२०२०

विराट कोहली आणि कोरोना...

कोरोना आणि लॉकडाऊनच्या काळात गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांना मोठा फटका बसला आहे. आर्थिक अडचणींना हे दोन वर्ग सामोरे जात आहेत. पण काही लोकांनी इनवेस्टमेंट केली असेल तर ते किमान जगण्यापुरते खाऊ शकतात. इनवेस्टमेंट खूपच महत्वाची असते. किती करावी हे प्रत्येकाच्या इनकमवर अवलंबून असते. अशी आपत्ती कधी येईल असा विचारच कुणी केला नसेल. पण कोरोनामुळे आपण महत्वाचा धडा शिकलो आहोत. त्यामुळे बॅकअप तयार ठेवणं खूप महत्वाचं आहे. प्लॅन ए सक्सेसफुल नाही झाला तर प्लान बी तयार असला पाहिजे. आज मी विराट कोहलीबद्दल सांगणार आहे. विराट हा आता श्रीमंत माणूस आहे. त्याचा उल्लेख फक्त उदाहरणासाठी दिले आहे. आपण आपल्यापरीने आणि क्षमतेने गोष्टी करायच्या आहेत. विराटकडून आपण बर्या च गोष्टी शिकू शकतो. तो वयाने आपल्यापेक्षा लहान असला तरी कर्तृत्वाने खूप मोठा आहे आणि भारतात वयाचा मान मिळतोच पण कर्तृत्वासमोर लोक नतमस्तक होता... ज्ञानेश्वर माऊलींसमोर सगळे नतमस्तक झालेच ना?

विराट कोहलीला तुम्ही मौदानात चौकार, षटकार मारताना पाहिले आहे. त्याची ऊर्जा आणि खेळण्याची पद्धत अत्यंत वेगळी आणि नाविन्यपूर्ण आहे. आहार आणि फिटनेसच्या बाबतीत तो अतिशय काटेकोर आणि शिस्तबद्ध आहे. संतुलित आयुष्य जगणारा आणि क्रिकेटचं मैदान

गाजवणारा विराट कोहली हा एक उत्तम उद्योजक सुद्धा आहे. अतिशय तरुण वयात त्याने उद्योजकीय विश्वात पाऊल ठेवलं. आपण पाहिले असेल की अनेक सेलिब्रिटी करोडोंमध्ये खेळायचे आणि एकाएकी त्यांची परिस्थिती हालाखीची होते. ती कशामुळे होते? तर त्यांनी गुंतवणूक केलेली नसते. भविष्याची तरतूद केलेली नसते.

तुमचं आजचं उत्पन्न प्रचंड असेल तर तुम्ही त्यातला काही भाग चांगल्या ठिकाणी गुंतवला पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे व्यावसायिक गुंतवणूक सुद्धा करणे गरजेचे आहे. हेच विराट कोहलीने केले आहे. त्याचं म्हणणं आहे की आपण आयुष्यभर क्रिकेट खेळू शकत नाही. त्यामुळे रिटायरमेंटनंतरची तरतूद आत्ताच करून ठेवली पाहिजे आणि याच उद्देशाने त्याने उद्योजकीय क्षेत्रात पदार्पण केले.

विराट कोहलीची ब्रँड वॅल्यू प्रचंड आहे. २०१७ मध्ये त्याची ब्रँड वॅल्यू ६१६ कोटी होती. महत्वाचे म्हणजे गेली २५ वर्ष उच्चतम ब्रँड वॅल्यू असणार्याक शाहरुख खानला त्याने मागे टाकलं. या सर्व गोष्टी शक्य झाल्या कारण त्याने प्रत्येक काम स्मार्ट्ली केलं. तो एक स्मार्ट क्रिकेटर आहेच, पण त्याच बरोबर एक स्मार्ट उद्योजकही आहे. त्याच्याकडे विविधतेने गुंतवणूक करण्याची कला आहे. एक स्मार्ट गुंतवणूकदार होणं ही एका स्मार्ट उद्योजकाची उजवी बाजू आहे.

विराट कोहली २०१४ मध्ये इंडिया सुपर लीग क्लब गोवाचा सह-मालक

झाला. क्रिकेटनंतर फुटबॉल हा त्याचा अत्यंत आवडता खेळ आहे. भारतात फुटबॉलला अच्छे दिन यावे अशी त्याची इच्छा आहे. वयाच्या २६ व्या वर्षी त्याने केलेली पहिली व्यावसायिक गुंतवणूक होती. त्यानंतर त्याने मागे वळून पाहिले नाही. वैयक्तिक आयुष्यात आणि क्रिकेट जीवनात तो जितका शिस्तबद्ध आहे, तितका तो व्यवसायाबद्दलही शिस्तबद्ध आहे. २६ व्या वर्षी एक तरुण भविष्याचा विचार करतो, हीच केवढीतरी मोठी बाब आहे.

त्यानंतर विराट कोहलीने फॅशन जगतात पाऊल ठेवले. नोव्हेंबर २०१४ मध्ये त्याने WROGN नावाचा ब्रँड बाजारात आणला. WROGN हा क्लोथिंग आणि ऍक्सेसरी ब्रँड आहे. WROGN ने मिंत्रा आणि शॉपर्स स्टॉप सह ताइ-अप केला आहे. पाहता पाहता WROGN ने तरुणांवर भुरळ घातली आणि एक अग्रगण्य ब्रँड झाला. २०१८ मध्ये १०० देशांमध्ये त्याला हा ब्रँड लॉच करायचा आहे आणि त्याची क्षमता व कष्ट पाहता तो सातासमुद्रापार सुद्धा WROGN ब्रँडला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाईल.

कोहलीचा सर्वात मोठा फायदा हा आहे की तो स्वतःच एक ब्रँड आहे आणि त्याने त्याचे मूल्य ओळखले देखील आहे. कस्तुरी आपल्या जवळच आहे, हे आपण ओळखले तर पाहिजे. नाहीतर आपण उगाच मृगजळामागे धावत बसू. विराटकडे काय आहे, तो कोण आहे याची जाणीव त्याला झालेली आहे. "स्पोर्ट्स कॉन्वो" या सोशल मिडीया

नेटवर्किंगचा तो शेअरहोल्डर आणि ब्रॅम्ड ऍम्बॅसेडर झाला. मुख्य म्हणजे ही सोसल नेटवर्किंग भारताबाहेरील आहे, लंडन स्थित आहे.

२०१४ मध्ये त्याने स्मार्ट गुंतवणूक केली. २०१५ मध्येही त्याने गुंतवणूकीची श्रृंखला सुरु ठेवली. विराट आहार आणि फिटनेसबद्दल खुप गंभीर आहे आणि आपल्याप्रमाणे इतरांनीही हे नियम पाळावे असे जर त्याला वाटले तर यात काही वावगे नाही. त्याने Chisel नावाची स्वतःची जिम श्रृंखला सुरु केली. या व्यवसायात त्याने ९० कोटी रुपये गुंतवले आहेत. ही जिम श्रृंखला Chisel Fitness, CSE आणि कोहलीच्या संयुक्त मालकीची आहे.

पुढे कोहलीने दुबई स्थित युएई रॉयल्स (टेनिस) या टीममध्ये गुंतवणूक केली. या टीमचे नेतृत्व रॉजर फेडरर करतो. त्याच बरोबर बेंगलुरु योद्धास (व्रेसलिंग) मध्येही त्याने गुंतवणूक केली आहे. एक स्पोर्ट्समन मसूनही त्याने विविध क्षेत्रात केलेली गुंतवणूक म्हणजे गुंतवणूकीविषयीचा त्याच्या अभ्यासाची ग्वाहीच देते. पुढे त्याने Stepathlon Lifestyle सोबत भागीदारी करुन Stepathlon Kids मध्ये गुंतवणूक केली.

फॅशन, फिटनेस, लाईफस्टाईल, सोशल मिडीया अशा विविध क्षेत्रात क्रिकेट जीवनात असतानाच त्याने प्रवेश केला आहे. त्याशिवाय अनेक जाहिरातींध्ये तो झळकत असतो. त्यातून त्याला प्रचंड मानधन मिळत

आहे. परंतु त्याला कल हा उद्योगाकडे अधिक दिसून येतो. या सर्व उद्योगामाधूनही त्याला उत्कृष्ट परतावा मिळत आहे, यापुढेही मिळणार आहे. कदाचित भविष्यात तो अजून बर्या च ठिकाणी गुंतवणूक करेल. स्वतःवर विशेषतः भार न घेता गुंतवणूक करुन त्यातून उत्पन्न निर्माण करणारा विराट हा एक स्मार्ट उद्योजक आहे. आपली मिळकत जर उत्तम असेल तर आपणही विराट प्रमाणे इतर पर्यायांमध्ये गुंतवणूक करुन आपले भविष्य सुरक्षित आणि उज्वल करु शकतो. विराट कोहली हा केवळ तरुण क्रिकेटर्ससाठी नव्हे तर नवौद्योजकांसाठी सुद्धा तो एक आदर्श आहे.

विराटचा आवाका खूप मोठा आहे. पण त्याच्याकडून प्रेरणा घेऊन आपण आपल्या पद्धतीने काही गोष्टी नक्कीच करु शकतो आणि यशाला मर्यादा नसतेच… टाइम सबका आता हैं बॉस… सध्या सगळ्यांवर संकटांचं डोंगर कोसळलेलं असलं तरी… गल्ली बॉयमधलं ते गाणं लक्षात ठेवा… अपना टाईम आयेगा…

१५/०७/२०२०

त्या फुलांच्या गंधकोशी...

देव पावला, तो देवासारखा धावून आला, अतिथी देवो भवः, गुरुदेव... देव हा शब्द आपल्या जीवनाचा महत्वाचा भाग आहे. खरं पाहायला गेलं तर आपण कुणीच देव पाहिलेला नाही, तसे आपण भूतही पाहिलेले नाही. तरी भूताची भिती वाटली आणि राम राम म्हटलं तर मनाला बळ मिळतं. ही काय किमया आहे? अनेक वर्षांपासून मानवी मनावर असे संस्कार झालेले आहेत. कोणतेही संकट आले तरी आपण देवाचा धावा करतो. बर्यायचदा एखादा माणूस जीवन मरणाची लढाई लढत असेल तर डॉक्टर सुद्धा म्हणतात की आम्ही प्रयत्न केले आहेत, आता सगळं देवाच्या हाती आहे. एखादी मिसाईल लॉच केल्यावर वैज्ञानिक सुद्धा देवाच्या पाया पडतात. दीवार चित्रपटात नास्तिक असलेला, मंदिराची पायरीही न चढलेला अमिताभ शेवटी देवासमोर उभं राहून म्हणतो "आज खुश तो बहुत होगे तुम"... आपण कधीही ज्या देवाला पाहिलं नाही त्या देवाकडून आपल्याला किती आशा असते.

एक गोष्ट सांगतो. एक नास्तिक माणूस होता. म्हणजे नास्तिक माणूस परवडला, पण ही काहीतरी वेगळीच भानगड. कशावरच विश्वास नाही या माणसाचा. प्रत्येक गोष्टीत हा कारण शोधत असे. इतकचं काय तर प्रेम म्हणजे सुद्धा खोटेपणा आहे, असं याचं मत. कारण प्रेम निस्वार्थ असतं असं म्हणतात. पण याचं म्हणणं असं की कोणतही नातं निस्वार्थी नसतं. भावना या शब्दाचा त्याला तिटकाराच होता. तरीही

याचं लग्न झालेलं होतं. कसं जमलं कुणास ठाऊक. पुर्वी याची परिस्थिती खुप चांगली होती. पण हल्ली कुणाची नजर लागली कुणास ठाऊक? पैसा टिकत नसे, पत्नी सतत आजारी, याचीही तब्येत अधून मधून बिगडत असे. होतं नव्हतं सगळ गेलं. धंद्यात तोटा झाला. बायको नेहमी सांगायची एखाद्या ज्योतिषाला किंवा महाराजांना भेटूया. पण नाही म्हणजे नाहीच. त्याच दरम्यान त्यांच्या गावात एक मोठे सुप्रसिद्ध साधू महाराज आले होते. बायकोने हट्टच धरला की महाराजांना भेटायला जाऊया. हा काही ऐकायला तयार नाही. अखेर बायका नेहमी जे अस्त्र वापरतात ते तिनंही वापरलं. अश्रूंचं अस्त्र. या अस्त्रा पुढे त्याला नमावंच लागले. स्त्रीच्या अश्रूसमोर नेपोलियन सारख्या महान योद्ध्याची तलवारही गळून पडली आहे. हा तर साधा माणूस. ते महाराजांकडे आले.

महराजांनी त्यांच्याकडे स्मीत हास्य केलं. त्याच्या बायकोने सारं गार्हाणं सांगितलं. तो मात्र महाराजांकडे कुचेष्टेने पाहत होता. महाराजांनी त्यांना एक पेटी दिली आणि म्हटलं. ही पेटी जोपर्यंत बंद आहे. तुम्हाला कोणतेही संकटं शिवू शकणार नाही. पुर्वीचे वैभव परत येईल. पण जर ही पेटी उघडली तर मात्र विनाश होईल. त्याने महाराजांसोबत वाद घातला, त्यांना पाडून बोलला. पण पत्नीने समजवले, तसा तो नाइलाजाने शांत झाला. त्याचा महाराजांवर मुळीच विश्वास नव्हता. त्याचा कर्तृत्वावर विश्वास होता. पण त्याची सर्व आशा मरुन गेली होती. ते घरी आले. पत्नीने ती पेटी देवघरात ठेवली. पण

त्याला मात्र फार उत्सुकता लागून राहिली, नेमकं काय असेल या पेटीत? तो महाराज मुर्ख तर बनवत नसेल ना? कधी या कुशीवर तर त्या कुशीवर तो पहुडल्या पहुडल्या विचार करत होता. तिला मात्र शांत झोप लागली होती. कारण महाराजांनी एक आशा दिली होती... एका क्षणी तो झपाटल्यासारखा पटकन उठला आणि देव घरात गेला. तसा तो तिथे कधी जात नसे. बायकोच्या हट्टापायी त्याने देव घर बांधायची परवानगी दिली होती. पण तो नेहमीच देवाची टिंगल करत असे. तो देवघरात आला व त्याने ती पेटी हातात धरली. महाराजांनी सांगितलं होतं की पेटी उघडू नये. पण त्याची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. का कुणास ठाऊक त्याला घाम फुटला होता. त्याने पेटी उघडली, पेटीत कोंडलेला प्रकाश एकाएकी त्याच्या डोळ्यावर पडला. त्यामुळे त्याला समोरचं काहीच दिसेनासं झालं. पेटीसोबत काही आकृत्याही बाहेर पडताना त्याला पुसटश्या दिसल्या. त्या आकृतींनी त्याच्या शरीराला विळखा घातला. पेटी त्याच्या हातातून खाली पडली. त्याला वेदना असह्य झाल्या. तो ओरडू लागला. त्याचा आवाज ऐकून बायको जागी झाली. ती धावतच देवघरात शिरली. तर तो खाली पडला होता, त्याला अर्धांगवायूचा झटका आला होता. पेटी त्याच्या बाजूला होती. तिनं थरथरत त्याला स्पर्श केला. तो तिला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत होता. पण तिला काहीच कळत नव्हत. फक्त तो पेटीबद्दल काहीतरी सांगत आहे एवढंच कळलं. वाईट आकृत्या थैमान घालत होत्या. तिच्या काळजात चर्र झालं. तिनं पेटीमध्ये पाहिलं. पेटीतील वाईट शक्ती मोकळ्या झाल्या होत्या. पण पेटीत अजून कुणीतरी होतं. कोण आहे?

हे जाणून घ्यायला तिने निरखून पाहिलं. तर पेटीत "आशा" घुसमटून पडली होती.

सर्वसामान्य माणसासाठी ही आशा किती महत्वाची असते. त्या माणसाची आशाच मेली होती. काही माणसे खरोखर नास्तिक असतात. पण अनेक माणसे नास्तिक असण्याचे ढोंग करत असतात. देवाला रिटायर्ड करा हे नास्तिक किंवा अति बुद्धिवादी माणसाला बोलणे सोपे आहे. तो देवाशिवाय जगू शकतो. पण सर्वसामान्य माणसाचं काय? त्याला देवाचा आधार आहे. सामान्य माणूस लहान मोठ्या संकटांशी केवळ देवाच्या नावाने लढा देतो. कुणावर अतिशय वाईट प्रसंग ओढवला तर तो श्रीरामाची इच्छा म्हणतो... श्रीराम या एका शब्दाने त्याचं मन हलकं होतं. देव ही संकल्पना म्हणजे सायकोलॉजिकल थियरी आहे. देव आहे किंवा नाही याविषयी वाद घालण्यात मला फारसा रस नाही. तुम्ही आस्तिक किंवा नास्तिक असल्याने या जगाला काही फरक पडणार नाही. तुम्ही माणूस म्हणून कसे आहात आणि तुमचे कर्तृत्व काय आहे यामुळे मात्र जगामध्ये बदल घडू शकतो. परवा एका बाईसाहेबांचा फोन आलेला. त्यांच्या मिस्टरांची ऍंजिओप्लॅस्टी झालेली आहे. म्हणून त्यांना असं वाटतं की मिस्टरांना जर कोरोना झाला तर काय करायच? त्या टेन्शनमुळे त्यांना झोपही लागत नाही. डॉक्टरांनी सुरुवातीला झोपेच्या गोळ्या दिल्या पण नंतर मात्र दुधात जायफळाची पूड घालून प्यायला सांगितलं. तरीही झोप लागेना. इतकी कोरोनाची भिती सामान्य माणसाला आहे. माझ्याशी बोलल्यानंतर त्यांना जरा धीर

आला आणि त्या म्हणाल्या स्वामींनीच (स्वामी समर्थ) तुम्हाला माझ्यासाठी पाठवलंय... ही आशा आहे. मी एक सर्वसामान्य लेखक, मी सल्लागार सुद्धा नाही. (या अनुभवामुळे पुढे सल्लागार व्हायला हरकत नाही) पण या काळात काही लोकांशी मी फक्त त्यांच्या घरातला माणूस म्हणून चर्चा केली आणि त्यांना बरं वाटलं. त्यांचं म्हणणं देवानेच माझी त्यांच्याशी भेट करुन दिली.

आज कोरोनाच्या संकटात आणि लॉकडाऊनमुळे आर्थिक नुकसान सोसावे लागत असल्यामुळे केवळ देव हाच आशेचा किरण आहे. मग अशा देवाला रिटायर्ड का करायचं? बुद्धिवादी लोक सामान्य माणसाशी कनेक्ट होऊ शकले नाही याचं कारण त्यांना असं वाटतं की जगातल्या प्रत्येकाने त्यांच्यासारखा विचार करावा. पण बुद्धिवाद्यांना लोकांच्या मनाचा ठाव कधीच लागला नाही. अनंत कणेकरांच्या आयुष्यातला हा प्रसंग... कणेकर हे साहित्यिक होते. प्रभातच्या माणूस चित्रपटाचे संवादलेखन त्यांनी केले आहे आणि गीत त्यांनी लिहिले आहे. ते त्यांच्या नास्तिक मित्रांसोबत पंढरपुरला गेले होते. विठुरायाला पाहिल्यावर त्यांनी विठुरायाच्या चरणावर डोके ठेवून चमस्कार केला. हे पाहून सगळे मित्र अवाक झाले. मित्र म्हणाले "अहो कणेकर, आपण नास्तिक आहोत आणि तुम्ही चक्क विठ्ठलाला नमस्कार केला?" कणेकर म्हणाले की "खरंय, आपण नास्तिक आहोत. आपला देवावर विश्वास नाही. पण माझा तुकोबांवर विश्वास आहे, ज्ञानोबांवर विश्वास आहे. जर ते येऊन इथे डोकं ठेवू शकतात तर इथे नक्कीच काहीतरी

आहे..."

आपण देव पाहिला नाही, देव आपल्याला दर्शन देईल की नाही, हे माहित नाही, देव खरोखर आहे की नाही हेही माहित नाही. पण तुकोबांना त्याने दर्शन दिलं, समर्थ रामदासांना त्याने दर्शन दिलं, ज्ञानेश्वर माऊलींना त्याने दर्शन दिलं... या थोर महापुरुषांना देवाने दर्शन दिलं आणि हे देवासमोर नतमस्तक होऊ शकतात तर आपली काय बिशाद? देव चराचरात आहे हे सांगणारी आपली संस्कृती आहे. चराचरात देव म्हणजे चराचरात व्हायब्रेशन... निर्जीव वस्तूला आपण हात लावला तरी तिथे कंपन निर्माण होतं... देव ही संकल्पना सर्वसामान्य माणसाला धीर देण्यासाठी आणि कोणत्याही बड्या संकटाशी सामना करण्यासाठी पुरेशी असते. आपण राम म्हणतो, समर्थांनी आत्माराम सांगितला... देवाच्या मूर्तीसमोर उभं राहून हात जोडले तरी हजार हत्तीचं बळ येतं... बुद्धाच्याही कितीतरी मूर्त्या आहेत. मग हा बुद्धाचा पराभव म्हणायचा का? नाही... बुद्धाच्या मूर्तीकडे पाहुन सगळा राग, सगळे दोष क्षणासाठी का होईना शांत होतात. आज कोरोनाच्या संकटात कितीतरी लोक कोरोना नाहिसा व्हावा म्हणून यज्ञ करत आहेत, देवासमोर हात जोडून कोरोना रुग्णांसाठी प्रार्थना करत आहेत. चंदू काका आणि जयंत एस. कुलकर्णी या माझ्या ओळखीतल्या व्यक्ती ईश्वराकडे कोरोना नाहिसा होण्यासाठी प्रार्थना करतात... लोकांना बळ देतात... देव कुठे आहे? असा प्रश्न आपल्याला पडतो तेव्हा भक्त प्रल्हादची व नरसिंहाची कथा आठवल्यावाचून राहवत

नाही... देव कुठे कुठे आहे? याचं वर्णन करणार एक सुंदर भक्तीगीत सूर्यकांत खांडेकर यांनी लिहिले आहे. पंडीत ह्रदयनाथ मंगेशकरांनी संगीतबद्ध केलंय आणि गायलं सुद्धा आहे. हे गीत मी या लेखाच्या शेवटी देतो. मी तुम्हाला विनंती करेन की हे गीत अवश्य ऐका... आणि या जगातून कोरोना नष्ट व्हावा व कोरोनाग्रस्त लोक लवकर बरे व्हावे यासाठी मी मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीरामांच्या चरणी प्रार्थना करतो... सुखी रहा, ईश्वर तुमचं भलं करो... राम तुमच्या सोबत आहे हे मुळीच विसरु नका.

त्या फुलांच्या गंधकोषी, सांग तू आहेस का ?
त्या प्रकाशी तारकांच्या, ओतिसी तू तेज का ?
त्या नभांच्या नीलरंगी, होऊनिया गीत का
गात वायूच्या स्वरांनी, सांग तू आहेस का ?
त्या फुलांच्या गंधकोषी...

मानवाच्या अंतरीचा, प्राण तू आहेस का ?
वादळाच्या सागराचे, घोर तें तू रूप का ?
जीवनीं या वर्षणारा, तू कृपेचा मेघ का ?
आसमंती नाचणारी, तू विजेची रेघ का ?
त्या फुलांच्या गंधकोषी...

जीवनी संजीवनी तू, माऊलीचें दूध का ?

जीवनी संजीवनी तू, माऊलीचें दूध का ?
कष्टणाऱ्या बांधवांच्या, रंगसी नेत्रात का ?
मूर्त तू मानव्य का रे? बालकांचे हास्य का?
या इथें अन् त्या तिथें रे, सांग तू आहेस का ?
त्या फुलांच्या गंधकोषी... सांग तू आहेस का ?

१६/०७/२०२०

टाटा सुमो म्हणजे मराठी माणूस...

माझ्यासोबत जो कोविड वॉर्डमध्ये ऍडमिट होता आणि आता क्वारंटाईन सेंटरमध्ये जो माझ्या सोबत आहे, तो १७ - १८ वर्षांचा मुलगा... देवा मिश्रा... काल त्याचा बारावीचा निकाल लागला आणि त्याला ८५ टक्के मिळाले. देवा हा खूप बोलका मुलगा आहे. त्याचंही पूर्ण कुटुंब कोरोना पॉजिटिव्ह झालं आहे. पण कोरोनाने त्याला आधी गांठलं म्हणून त्याला इतके दिवस कुटुंबापासून वेगळं राहावं लागलं. इथे क्वारंटाईन सेंटरमध्ये त्याला वेगळी रुम दिली आहे. म्हणून त्या पोराला एकटेपणा बोचतो... तो इथे आल्यापासून घरी कधी जाऊ याचाच विचार करतोय. उद्या आम्ही इथून सुटणार आहोत. कोरोना वॉर्ड आणि क्वारंटाईन सेंटरमध्ये अनेक लोक भेटले. त्यांची व्यक्तीचित्रे मी मनात साठवून ठेवली आहेत. एखादी कथा किंवा स्क्रिप्ट लिहिताना ही व्यक्तीचित्रे कामी येतात. नाटकात, चित्रपटात किंवा कथांमध्ये जी पात्रे दिसतात ती कुठेतरी वास्तविक आयुष्यात असतात. लेखकाचं काम निरीक्षण करण्याचं आहे आणि त्या माणसांना थोडसं वळण देऊन त्यांचं पात्रांमध्ये रुपांतर केलं जातं.

इथे वेगवेगळ्या जातीचे, भाषेचे लोक आहेत... महाराष्ट्राचं राजकारण जात आणि मराठी माणूस या दोन मुद्द्यांभोवती रेंगाळत असतं. पण जसं शाळा-कॉलेज किंवा ऑफिसमध्ये जात आणि परप्रांतीय वगैरे मुद्दे आपण विसरुन जातो. तसं चित्र इथे पाहायला मिळतं. इथे कुणी

कुणाची जात विचारत नाही, तो मराठी आहे की परप्रांतीय याच्याशी कुणाला देणं घेणं नाही... आपण सगळेच रुग्ण आहोत ही सेक्युलर भावना आहे. रुग्णाला कसली आलीय जात आणि प्रांत नाही का? प्रत्येक जण आपलं दुःख किंवा जीवनातील प्रसंग एकमेकांना सांगतात... सगळ्यांना माहिती आहे की आपण जास्त काळ सोबती नाही. इथून डिस्चार्ज मिळाला तर आपण एकमेकांचे तोंडही कधी पाहणार नाही. पण जोपर्यंत एकत्र आहेत, तोपर्यंत आपण जीवाभावाचे मित्र आहोत असंच वाटून राहतं... भारतीय माणूस मुळातच बोलका आहे. म्हणून कुठेही गेला तरी त्याची पटकन दोस्ती होते. आपण गावाला ट्रेनमधून जात असलो तरी शेजारी बसलेल्या माणसाशी आपण जन्मोजन्मीचे नाते असल्यासारख्या गप्पा मारतो...

मराठीचा मुद्दा इथे अशाचसाठी उपस्थित केला कारण मागच्या एका लेखात मी हा मुद्दा घेतला होता आणि कशाप्रकारे मराठी माणूस या भोवती राजकारण आणि समाजकारण फिरत असल्यामुळे मराठी माणसाचं नुकसान झालं याची चर्चा आपण केली होती. माझे काही मित्र आहेत, त्यांना असं वाटतं की गुजराती माणूस म्हटला की तो श्रीमंत किंवा व्यापारीच असतो. हा मराठी माणसाचा न्यूनगंड आहे. ही मुळात कम्युनिस्ट विचारधारा आहे. श्रीमंत माणसांचा द्वेष करायचा तसा मराठी माणसांच्या मनात गुजराती मारवाडींविषयी द्वेष पसरवण्यात आला. पण मी गंमतीने म्हणतो की तुम्ही गुजरातच्या कोणत्याही रेल्वे स्टेशनला उतरलात की तुम्हाला गुजराती रिक्षावाले दिसतात. एकदा

गुजरातला जाऊन या, म्हणजे तरी तुमची खात्री पटेल की गुजराती हे फक्त व्यापारी नसतात. उगाच आपण नको तो न्यूनगंड बाळगून आपल्याच माणसांना मागास करत असतो. प्रत्येक राज्यात कुणी व्यापारी असतो, कुणी नोकरी करणारा, कुणी गरीब तर कुणी बेरोजगार... फक्त गुजराती कम्युनिटीने व्यापारी कम्युनिटीचा दर्जा मिळवला आहे. मराठी माणसाची मात्र अति राजकारणापोटी घसरण झाली. मला तरी मराठी माणूस कधीच कमकुवत वाटला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांमुळे लढण्याचा वारसा आपल्याला मिळालेला आहे. पण आता कुणी तलवार घेऊन बाहेर पडेल का? लोक आजही पेटून उठा वगैरे भाषणे देतात. छत्रपती शिवरायांच्या नावाने वाह्यात राजकारण करतात. पण आपल्याला आपापल्या क्षेत्रातले शिवराय व्हायचे आहे.

मला मराठी माणूस खूप क्रिएटिव्ह वाटतो. फक्त आपला न्यूनगंड टाकून दिला पाहिजे. सांगत्ये ऐका या चित्रपटासाठी गदिमांनी बुगडी माझी सांडली गं हे सुंदर गीत लिहिलं. राम कदम यांच्याकडे संगीताची जबाबदारी होती. राम कदम व्ही शांतरामांना चाली ऐकवत होते. पण शांताराम बापूंना एकही चाल आवडली नाही. तुमचा विश्वास बसणार नाही पण त्यांनी शांताराम बांपूंना १२० चाली ऐकवल्या. राम कदम हे लहान संगीतकार नव्हते. त्यांचही मोठं नाव होतं. तरी त्यांनी १२० चाली ऐकवल्या. शेवटी दोघं पण वैतागले... राम कदम त्यांच्या घरातून बाहेर पडले... आणि पुढे गेल्यावर त्यांच्या कानावर आवाज पडला आणि अचानक त्यांना चाल सुचली. राम कदम तसेच मागे फिरले

आणि शांताराम बापूंना भेटले... ती चाल शांताराम बापुंना ऐकवली आणि त्यांना ती आवडली. ही चाल कशी सुचली तर रस्त्यात बायकांच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. कुणीतरी गेलं होतं आणि बायका रडत होत्या, माझा टिंब टिंब गेला गं.... त्यावरुन चाल सुचली... बुगडी माझी सांडली गं... हा मराठी माणूस आहे. म्हणून राजकीय पटलावरुन मराठी माणसाच्या नावाने राजकारण बंद झालं पाहिजे आणि मराठी उद्योजक हे थांतांड बंद होऊन केवळ उद्योजक असं म्हटलं गेलं पाहिजे... उद्योजकाची भाषा मराठी, गुजराती, मारवाडी असू शकते. पण उद्योजक हा फक्त उद्योजक असतो. "मानवतेची (बिजनेस) लॉबी उभारूया..." या आधीच्या लेखात मी हा विषय हाताळला आहे. परंतु आज मला एक उत्तम उदाहरण द्यायचं आहे...

आपल्याला टाटा समुह माहितीच आहे. आज कोरोनाच्या कहरात रतन टाटा व टाटा समुहाने लोकांसाठी जे केलंय ते कुणीच विसरु शकत नाही. या देशभक्त माणसाची आणि उद्योजकीय समुहाची परतफेड करायची असेल तर त्यांचे उत्पादक विकत घेणे हेच होय... आपल्याला टाटा सुमो सुद्धा माहिती आहे. पण तुम्हाला माहिती आहे का टाटा सुमो हे नाव एका मराठी माणसावरुन पडलं आहे. होय... त्यांचं नाव सुमंत मूळगावकर.... सुमंत मूळगावकर हे उद्योजक होते. टाटा मोटरची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. टाटाचा ट्रक खूप फेमस आहे. रस्त्यावर आपल्याला अनेक टाटाचे ट्रक्स दिसतात. त्या काळी या ट्रक्सबद्दल ट्रक ड्रायव्हर्सना काही समस्या येत होत्या. टाटा

मोटर्सचे मोठमोठे इंजिनियर्स या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करत होते पण कुणाला ते जमलं नाही. ड्रायव्हर्स खुश नव्हते. पण त्या समस्येचं निराकरण सुमंत मूळगावकरांना सापडलं आणि ड्रायव्हर्स खुश झाले. सगळ्यांनी त्यांना विचारलं की तुम्ही ही समस्या कशी सोडवली... तर मूळगावकरांनी जे उत्तर दिलंय ते सगळ्या उद्योजकांनीच नव्हे तर राजकीय, सामाजिक व सगळ्या क्षेत्रात काम करणार्या लोकांनी ते लक्षात घेतलं पाहिजे. मूळगावकर जेव्हा ऑफिसमधून बाहेर पडायचे तेव्हा सूट्बुट घालण्याऐवजी सामान्य माणसासारखा पेहराव करुन बाहेर जायचे आणि ढाब्यावर जाऊन जेवायचे. ढाब्यावर त्यांना अनेक ट्रक ड्रायव्हर्स भेटायचे. ते थेट त्या ड्रायव्हर्ससोबत चर्चा करायचे आणि अशाप्रकारे त्यांना मूळ समस्या कळली म्हणून त्यांना समस्येचं निराकरण करता आलं. त्या बिचार्या ड्रायव्हर्सना माहित नव्हतं की आपण ज्याच्याशी चर्चा करतोय, ज्याला तक्रारी सांगतोय तो एक मोठा उद्योजक आहे आणि त्याने बनवलेला ट्रक आपण चालवतोय. मित्रांनो सुमंत मूळगावकर रस्त्यावर उतरले... इतर लोक मोठ मोठ्या ऑफिसमध्ये बसून आणि स्वतःच्या कंपूत राहून ड्रायव्हर लोकांच्या समस्या कशा सोडवता येतील यावर दिवसेंदिवस विचार करत होते. पण ज्याला समस्या आहे, त्याच्याशी कुणी चर्चा करत नव्हतं. ते सुमंत मूळगावकरांनी केलं... त्यांना भारत सरकारने पद्मभूषण पुरस्कार दिला आहे.

टाटा समुहाने त्यांना मानवंदना देण्यासाठी आपल्या गाडीचं नाव टाटा

सुमो ठेवलं... सुमो म्हणजे सुमंत मूळगावकर... होय एका मराठी माणसावरुन हे नाव पडलं आहे. अभिमान वाटतोय ना तुम्हाला मराठी असल्याचा? पण यात मराठी असण्याला काही अर्थ नाही. मूळगावकर जन्माने मराठी होते इतकंच... त्यांच्या कर्तृत्वामुळे आणि कार्यामुळे त्यांना हा मानसन्मान मिळाला आहे. त्यांच्या मराठी असण्यामुळे नव्हे... हे क्वारंटाईन सेंटरमध्ये बसून लिहिण्याचं कारण म्हणजे इथे वेगवेगळ्या लोकांना भेटलो. तसं मुंबईत राहत असल्यामुळे रोजच भेटतो. पण इथे त्यांच्याशी जवळीक साधली गेली... काही दिवसांसाठी का होईना, मनाचं एक नातं निर्माण झालं... या पार्श्वभूमीवर मराठी माणसाचा न्युनगंड आठवला... या न्यूनगंडामुळे आपलं खूप नुकसान झालं आहे. पण यापुढे असं होऊ नये अशी माझी तरी इच्छा आहे... आपण मराठी भाषा बोलतो खरंय, पण मित्रांनो, आपलं कर्तृत्व बोलतं...

१७/०७/२०२०

कोरोनातून निर्दोष मुक्तता

कोरोना डायरीज मालिकेतला आजचा हा शेवटचा लेख. कोरोना डायरीजच्या माध्यमातून अनेक लोकांशी ओळख झाली. नवे मित्र भेटले. आज क्वारंटाईन सेंटरमधून घरी आलो. जवळ जवळ २२ दिवसांनंतर घर पाहिलं... आज कैदेतून सुटल्यासारखं वाटतंय. या अर्थाने आज कोरोनातून आमची निर्दोष मुक्तता झाली आहे. कोरोनाची समस्या हिच आहे की कोरोनाची भिती वाटत नाही, पण उपचार पद्धतीचा कंटाळ येतो. विलगीकरण त्रासदायक असतं. पण प्राप्त परिस्थितीत आपले कर्तव्य ओळखून कृती केली तर समस्या लहान वाटतात. समस्या किंवा संकटे म्हणजे काय असतात? सावरकरांवर एखादे संकट कोसळले तर छत्रपती शिवाजी महाराज या परिस्थिती कसे वागले असते असा विचार ते करायचे. कोविड वॉर्डमध्ये असताना बाबा वारल्याची बातमी कळली तेव्हा काय करायचं हे कळत नव्हतं. मग सावरकर आठवले आणि अशा प्रसंगात सावरकर कसे वागले असते याचा विचार केला आणि मन स्थिर झालं. हिंदूंमध्ये मूर्तीपूजा ही कन्सेप्ट याचसाठी आहे. काय करायचं सुचत नसेल किंवा निर्णय घेता नसेल किंवा मन सुन्न झालं असेल तर आपल्या इष्ट देवतेसमोर नुसतं जाऊन बसलं तरी बळ मिळतं. देव-देवतांची मूर्ती म्हणजे एकप्रकारे आपलंच "थोर" प्रतिबिंब असतं. त्या प्रतिबिंबाशी एकरुप आपण होतो आणि हा हा म्हणता डोंगरा एवढ्या समस्या सहज नाहिशा होतात. हा चमत्कार भारतीय संस्कृतीत घडतो.

सावरकरांचे मनाला बळ देण्याचे तंत्र म्हणजे सदोदित प्रतिकूल तेच घडेल. सावरकर माझी जन्मठेपमध्ये लिहितात "प्रतिकूल तेच घडणार आणि मी त्यास तोंडही देणार असा निर्धार केला असता क्वचित अनुकूल तेच घडले तर अर्थातच काही एक हानी न होता उलट तो अनुकूलाचा आनंद द्विगुणित होतो; पण अनुकूल तेच घडेल अशी आशा, लालसा करीत बसले असता जर प्रतिकूल घडले - आणि असहाय पिढींत जन्मलेल्यांच्या जीवनांत तोच संभव अधिक - तर मात्र एकाएकी निराशेच्या कोसळणार्या पहाडाखाली धैर्याचा चक्काचूर होवून गेल्याविना सहसा राहात नाही." मनाला बळ देण्याचं सावरकरांचं हे तंत्र आहे. याचा अर्थ असा नाही की सतत वाईट घडण्याची अपेक्षा करायची. पण वाईट प्रसंगाला तोंड देण्यासाठी मनाची सिद्धता करायची एवढाच याचा अर्थ आहे. आजकाल आपल्या पॉजिटिव्ह थिकिंग सांगितलं जातं. सतत सकारात्मक विचार करा असं सांगितलं जातं. पण अगदी स्पष्ट सांगायचं झालं तर जगातल्या एकाही माणसाला सतत सकारात्मक विचार करणं अशक्य आहे. पॉजिटिव्ह थिंकिंगवर लेक्चर देणारे सुद्धा इतके पॉजिटिव्ह विचार करत नाही. म्हणजे उदाहरणार्थ कुणी जर त्यांच्या एका गालावर मारली तर ते काय पॉजिटिव्ह विचार करतील? व्वा व्वा... तू माझ्या कानाखाली आवाज काढलास, यामुळे मला कानाखाली खाण्याचा अनुभव मिळाला. एक नवीन गोष्ट शिकायला मिळाली. असं बोलणार आहे का तो? एकतर तो तुम्हाला शिव्या घालेल आणि बळकट असेल तर तुमचे दोनही गाल लाल करेल. त्यामुळे सतत

सकारात्मक विचार करणं अवघडच नाही तर अशक्यच आहे. मी आधीच्या लेखांमध्ये सकारात्मक विचार करण्याविषयी लिहिलं आहे. म्हणून या शेवटच्या लेखात त्याचा उहापोह करणार आहे.

लक्षात घ्या मित्रांनो, आपल्या मनात सतत विचार सुरु असतात. मी काही वर्षांपूर्वी एका अध्यात्मिक गटाच्या संपर्कात आलो होतो. तिथे काही साधक जमले होते. अनेक नवीन साधक होते. जे अध्यात्माबद्दल सांगत होते त्यांनी आम्हाला डोळे मिटायला सांगितले आणि डोळे मिटल्यावर तुम्हाला कृष्णाने दर्शन दिले का असे विचारले. सगळे जण हो हो म्हणले. मी मात्र स्पष्ट सांगू टाकलं नाही दिलं दर्शन. तर त्या महान अध्यात्मिक व्यक्तीने माझी अध्यात्मिक स्थिती चांगली नसल्याचे सांगितले. अध्यात्मावर बोलण्याचा मला अधिकार तर नाही. पण कॉमन सेन्सची गोष्ट आहे. मी जर तुम्हाला म्हणालो डोळे मिटा आणि आता तुम्हाला माधुरी दीक्षितने दर्शन दिले का? तर तुम्ही लगेच हो म्हणाल. कारण माधुरी दीक्षित कोण आहे हे तुम्हाला माहिती आहे. मी तिचं नाव घेतल्या घेतल्या तुमच्या मनाने तिची काल्पनिक प्रतिकृती तयार करुन तुमच्यासमोर ठेवली. याला दर्शन म्हणाल का? तसेच कृष्णाचे. मला माहितीय कृष्ण कसा दिसतो, त्या अध्यात्मिक पुरुषाने कृष्णाने दर्शन दिले का? असं म्हटल्यावर लगेच कृष्ण आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतोच. अगदीच नाही राहिला तर स्वप्नील जोशी तर नक्की उभा राहतो. हा मनाचा खेळ आहे. याला दर्शन वगैरे असे नाव देऊन ज्ञानोबा-तुकोबांसारख्या सिद्ध पुरुषांचा अपमान का

करायचा?

हाच मनाचा खेळ आहे. मन चिंती ते वैरी न चिंती असं म्हटलं जातं ते उगाच नव्हे. मनाला वळण देणं गरजेचं आहे. सकारात्मकतेकडे त्यास घेऊन जाणे गरजेचे आहे. पण म्हणून आपण कही सतत सकारात्मक विचार नाही करु शकत. आपण रोबोट नसून आपण मनुष्य प्राणी आहोत. आपल्याला भावना आहे. त्या भावना मेल्या तर आपण मशीन होऊ. मी संत-महात्मे असा शब्द वापरणार नाही. कारण संत-महात्मे भावनाशून्य नसतात. तर ते जगाचा विचार करतात. ते जगाच्या कल्याणासाठी विश्वेश्वराकडे पसायदान मागतात. म्हणून आपण भ्रमामध्ये राहणं सोडलं पाहिजे. अध्यात्माची किंवा सकारात्मक विचारांची अनुभूती अशी सहजा सहज होत नाही. कुणी असं म्हणालं तर त्याला लांबूनच नमस्कार करुन त्याचा निरोप घ्यायचा. कारण तो एकतर स्वतःला तरी फसवत असतो किंवा जगाला तरी फसवत असतो. सकारात्मकता म्हणजे काय? तर प्राप्त परिस्थितीत मन स्थिर ठेवून आपले कर्तव्य कोणते ते ओळखणे आणि त्यानुसार कृती करणे म्हणजे सकारात्मकता. विचार सकारात्मक नसतात. श्रद्धा सकारात्मक असतात. पॉजिटिव्ह थिंकिंग आणि पॉजिटिव्ह बिलीफ यातला फरक आपण समजून घेतला पाहिजे. विचार येतात आणि जातात. पण श्रद्धा दृढ असते, ती ढळत नाही. एखाद्या पतीव्रतेला तुम्ही त्याच्या नवर्याची लबाडी दाखवली तरी ती त्या दृष्यावर विश्वास ठेवत नाही. ते सत्य असलं तरी. कारण तिची श्रद्धा असते की माझा नवरा मला फसवणार

नाही. तिला माहिती असतं तो फसवतोय, पण मन मानत नाही, कारण श्रद्धा. तीच श्रद्धा आपली देवावर असते आणि भूतावर सुद्धा. होय भूतावरही श्रद्धा असते. कारण भूत नसतं असं आपण कितीही मनाला समजावलं तरी काळोखात गेल्यावर त्या अदृश्य शक्तीला आपण घाबरतोच. कारण मनात कुठेतरी कोरलेलं आहे भूतं असतात. आणि रामाचं नाव घेतलं की भूत पळतात हे सुद्धा मनात कोरुन ठेवलेलं असतं. म्हणून आपण रामनाम जपतो आणि मनातली भूतं पळून जातात.

मी यशस्वी होणारच ही श्रद्धा असेल तर याला सकारात्मकता म्हणता येईल. पण मी यशस्वी होणारच हा विचार असेल तर तो विचार नाहिसा होऊन मी यशस्वी कसा होणार? शक्य आहे का ते? असा विचारही दुसर्या क्षणी मनात येऊ शकतो. म्हणून श्रद्धा खूप महत्वाची आहे... सावरकर तेच सांगतायत... प्रतुकूल होणार म्हणजे प्रतिकूल होणार अशी श्रद्धा नव्हे... तर प्रतिकूल घडले तरी मी त्यातून बाहेर निघेन ही श्रद्धा आहे. शिवाजी महाराजांनी अफझलखाना वध केला, कधीतरी शांतपणे विचार करुन पाहा त्यावेळी त्यांची मानसिकता काय असेल? त्यांची सायकॉलॉजी काय असेल? त्यांना एकदा तरी वाटलं असेल ना, की जर आपण अयशस्वी झालो तर? तर काय करायचं? प्लान बी त्यांच्याकडे तयार होता. पण ते कॅलक्युलेटेड रिस्क होतं. आग्र्याला बाळ शंभूंना घेऊन जाणं हे सुद्धा प्रचंड रिस्की होतं. त्यांनी काय विचार केला असेल याचा आपण विचार केला पाहिजे. इतिहासाच्या पानांमध्ये

प्रसंग सापडतील पण मानसिकता कशी सापडेल? ती आपणच शोधून काढली पाहिजे. तुम्हाला माहिती आहे का? आज इज्राइल नावाचं राष्ट्र कसं निर्माण झालं? त्याकाळी ज्यूंना सगळे वेड्यात काढत होते... पण प्रत्येक ज्यूच्या मनात ही श्रद्धा होती "नेक्स्ट ईयर इन जेरुसलेम". हे वाक्य ते रोज म्हणायचे आणि त्यांच्या देवाइतकीच या वाक्यावर त्यांची श्रद्धा होती. म्हणून अशक्य वाटणारी गोष्ट आज शक्य झाली... इज्राइल निर्माण झालं... आज इतक्या कठोर प्रसंगाला तोंड देऊनही ते पाय रोवून उभे आहेत ते या श्रद्धेच्या बळावरच... श्रद्धा खूप महत्वाची. आज कोरोनाचं संकट असल्यामुळे लोकांच्या मनावर आघात झाला आहे. पण आपण सावरकरांचं तंत्र वापरलं तर? प्रतुकूल तेच घडेल. मलाही कोरोना होऊ शकतो. पण कोरोना झाला तरी त्याला न घाबरता मी त्याचा सामना करेन आणि त्याला पराभूत करेन ही भावना आपण ठेवली पाहिजे. इथे चित्रणाचं महत्व खूप आहे. मनात श्रद्धा निर्माण करायला चित्रण उपयोगी पडेल. जर कुणी कोरोनाबाधीत असेल तर त्याने आपण कुटुंबासोबत खूप छान वेळ घालवतोय असे चित्रण केले म्हणजे मनाच्या पटलावर ते चित्र उभे केले, एखाद्या चित्रपटासारखे तर नक्की फायदा होईल. कोणत्याही परिस्थितीला आधी स्वीकारणं खूप गरजेचं आहे. मी कोरोना पॉजिटिव्ह आलो तर मी पॉजिटिव्ह नाहीच असं मानण्याचा मूर्खपणा करु नये. सत्य परिस्थिती स्वीकारली पाहिजे आणि त्यानंतर आपण याच्या विरोधात लढा द्यायला सज्ज झालं पाहिजे. त्याच बरोबर आपण जर जिंकलो तर सर्वात आधी काय होईल याचं चित्रण केलं तर उत्तम. म्हणजे

कोरोनातून मुक्त झालो तर सर्वात आधी आपण काय करु? आपल्या प्रिय व्यक्तीला सांगू की मी कोरोना मुक्त झालोय. मग ते चित्रण डोळ्यांसमोर उभं केलं पाहिजे.

मित्रांनो... आता मी या लेखमालिकेपुरती रजा घेतोय. ही लेखमालिका मी इथेच संपवतोय. कोरोना पॉजिटिव्ह झाल्यापासून ते आज डिस्चार्ज मिळेपर्यंत लेख लिहायचे असा पण घेतला होता. आज ते व्रत सफल झाले. कोरोनाशी लढाण्यासाठी मी हे तंत्र वापरले. तुम्ही तुमचे तंत्र वापरु शकता, जर सुचत नसेल तर शिवाजी-सावरकर आहेतच मार्गदर्शन करायला. लोकांनी मला सांगितलं की तुम्ही आमचे प्रेरणास्त्रोत आहात, तुम्ही आमचे मार्गदर्शक आहात. पण मी खूपच लहान माणूस आहे. आई सरस्वतीची कृपा आहे, जिच्यामुळे मला लिहायला सुचतं. भगवान प्रभूरामचंद्रांचा वरदहस्त आहे ज्यामुळे इतक्या कठीण प्रसंगात मी लिहिता राहिलो. हनुमानाचे बळ बाठीशी आहे ज्याच्यामुळे मी खंबीर राहिलो आणि सर्वात महत्वाचे म्हणजे तुम्हा रसिकांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा सोबत आहेत... चार्ली चाप्लीन म्हणाला होता की मी चित्रपटात सर्वांमध्ये उठून दिसतो ते माझ्या सहकलाकारांमुळे. माझे सहकलाकार नॉर्मल वागताता आणि मी त्यांच्यात वेगळा दिसतो. म्हणून लोकांचं लक्ष माझ्याकडे वेधलं जातं. आज माझीही हिच भावना आहे. तुमच्यामुळे मी या कठीण प्रसंगाला सामोरा जाऊ शकलो. इतकंच नव्हे तर रुग्ण असूनही सतत तुमच्या संपर्कात राहिलो, लिहित राहिलो... तुम्हा मायबाप रसिकांना माझा साष्टांग दंडवत. मला खात्री आहे की या

लेखमालिकेमुळे तुम्हाला बळ मिळेल. कोरोनाच्या संकटाला तुम्ही सहज सामोरे जाल आणि विजय संपादन कराल. समर्थ म्हणतात आम्ही काय कुणाचे खातो तो राम आम्हाला देतो. त्याच प्रमाणे हे लेख जरी शरीररुपाने मी लिहित असलो तरी हा रामाचा प्रसाद म्हणून मी तुमच्यासमोर ठेवला... हे लेख लिहून व्हावे ही श्रींची इच्छा होती...

१८/०७/२०२०

समाप्त नव्हे... ही तर सुरुवात आहे....

कोरोना डायरीज...

कोरोना संक्रमण आणि कोविड सेंटरमध्ये राहावे लागण्याच्या परिस्थितीत, हे एखाद्यासाठी खुपच डिस्टर्ब करणारं होतं, मानसिक संतुलन ढासळवणारं होतं, पण त्याही परिस्थितीत जयेश न डगमगता खंबीरपणे लिहीत राहीला, टिकाकारांची पर्वा न करता एका लेखकाचं कर्तव्य पार पाडत राहीला.

एक डॉक्टर म्हणून मला ठाऊक आहे की एका कोविड रुग्णाची उपचारा दरम्यान काय अवस्था असते... तो पूर्णपणे कोलमडलेला, आतून घाबरलेला असतो. आपण यातून जगू की नाही हा एकच प्रश्न सतत छळत असतो, हातपाय गळून गेलेले असतात (एकतर आजाराने आणि दुसरं विचाराने) फक्त स्वतःबद्दल विचार करु शकतो एक सर्वसामान्य मनुष्य त्यावेळेस, पण अश्या परिस्थितीत पुस्तक लिहिणे जेणेकरून आपल्या अनुभवाचा फायदा इतरांनाही व्हावा हा विचार म्हणजे तुम्ही माणूस म्हणून किती वर आहात, किती ग्रेट आहात हेच दर्शवते.

डॉ. इमरान शेख

Cover Creation :

Aum Sainages

ओम साईनेजेस

सुघोष प्रकाशन